अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १७ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३४९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८+४



# मराठवाड्याला ५९ हजार कोटींची भेट

✔ सुराज्य/छत्रपती संभाजीनगर

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळ सदस्य यावेळी उपस्थित होते. तब्बल सात वर्षांनी कॅबिनेटची बैठक मराठवाड्यात आयोजित करण्यात आली होती. मराठवाड्यासाठी ५९ हजार हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा करण्यात आली आहे. नदीजोड प्रकल्पाच्या १४ हजार कोटींचाही यात समावेश आहे. मराठवाड्याला न्याय देण्यासाठी आणि ठोस निर्णय घेण्यासाठी आजची बैठक घेण्यात आली होती, असं या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**

## मुख्यमंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीत महत्त्वाचे निर्णय




### दुष्काळ जाहीर न करणे क्रूर थट्टा : पटोले

मराठवाड्यातील जनतेच्या समस्या मार्गी लागाव्यात यासाठी शिंदे-फडणवीस-पवार सरकारने छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळ बैठक घेतली, पण यातून मराठवाड्याच्या जनतेला काहीही मिळालेले नाही. ५९ हजार कोटींच्या योजना दिल्याचा ढोल पिटला जात असला तरी हा फक्त आकड्यांचा खेळ आहे. प्रत्यक्षात जनतेच्या हाती जेव्हा काही लागेल तेंव्हाच ते कळेल. मराठवाडा दुष्काळाच्या सावटाखाली आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या मराठवाड्यात वाढलेल्या आहेत, अशा परिस्थितीत दुष्काळ जाहीर करणे आवश्यक होते. पण राज्य सरकारने दुष्काळ जाहीर न करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

### जुन्या बाटलीत नवी दारू : दानवे

मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकूण ४६ हजार ४५३ कोटी ९० लाखांची घोषणा केली आहे. सोबतच १४ हजार कोटी नदीजोड प्रकल्पासाठी केले आहे. दरम्यान, याच मंत्रिमंडळाच्या बैठकीवरून विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. ४० मिनिटांच्या बैठकीसाठी इतका खर्च करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात जुन्याच घोषणा पुन्हा करण्यात आल्या आहेत. नव्या बाटलीत जुनीच दारू, अशा या घोषणा असल्याचं दानवे म्हणाले.

### मंत्रिमंडळ बैठकीतील हायलाईट्स...

- मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर जलसिंचन होणार. ११ जलसंपदा प्रकल्पांना मान्यता. १३ हजार ६७७ कोटींचा सुधारित वाढीव खर्च मंजूर.
- अंबाजोगाई तालुक्यात लाल कंधारी, देवणी देशी गोवंशाचे जतन करणार.
- छत्रपती संभाजीनगरला फिरत्या भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळेची स्थापना.
- ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी १,०७६ कोटींची वाढीव तरतूद. मराठवाड्यातील १२ लाखांपेक्षा जास्त महिलांना लाभ.
- हिंगोली येथे नवीन वैद्यकीय शासकीय महाविद्यालय उभारणार. ४८५ कोटी खर्चास मान्यता.
- राज्यातील वरिष्ठ निवासी डॉक्टरांना ८५ हजार रुपये दरमहा मानधन, १२.८५ कोटी खर्च.
- सौर ऊर्जा कुंपणासाठी रक्कम थेट हस्तांतरित होणार.
- समग्र शिक्षामधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात १० टक्के वाढ.
- राज्यातील शाळा आता दत्तक घेता येणार गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निर्णय.
- सिल्लोड येथे दिवाणी न्यायालय.
- परळी वैजनाथ येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय.
- परळी वैजनाथ येथे नवीन शासकीय कृषी व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालय.
- परळी वैजनाथ येथे सोयाबीन संशोधन प्रशिक्षण आणि प्रक्रिया उपकेंद्र. सोयाबीन उत्पादनास गती येणार.
- सोयगाव तालुक्यात शासन अनुदानित कृषी महाविद्यालय.
- नांदेड येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय.
- धाराशिव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा.
- जालना येथे आयटीआय इन्क्युबेशन सेंटर स्थापणार. १० कोटींची मान्यता.
- गोर (बंजारा) समाज भवनासाठी नवी मुंबई येथे भूखंड देणार.
- राज्यात 'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण' अभियान राबविणार.
- २००५ पूर्वी नियमित पदावर अस्थायी सेवेतील कार्यरत आणि २००९ मध्ये नियमित सेवेत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना मॅटच्या आदेशाचा लाभ.
- तुळजापूरसाठी सरकारकडून १३८५ कोटींचा निधी देण्याची घोषणा झाली आहे.
- महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन पीठांपैकी एक असलेल्या तुळजा भवानी मंदिर परिसरासाठी विकासकामे करण्यात येणार आहेत.

या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली.

यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले, यापूर्वी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते तेव्हा मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक झाली होती.

राज्यातच नाही तर देशात एक मोठी झेप मराठवाड्याने घेतली आहे. अनेकांनी मराठवाड्यासाठी घोषणा केल्या, आम्ही मात्र काम करतो आहोत. आत्तापर्यंत आमच्या मंत्रिमंडळाने सामान्य जनतेला डोळ्यासमोर ठेवूनच निर्णय घेतले आहेत.

---



## करजगी ऑर्किड स्कूलला बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपद

✔ **सुराज्य/सोलापूर** : शालेय शहरस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये नागेश करजगी ऑर्किड स्कूल सोलापूरने विजेतेपद पटकावले आहे. कुमठा नाका इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या बॅडमिंटन मुलांच्या अंतिम सामन्यात शाळेचे विद्यार्थी शर्व बिराजदार व प्रेम काटवे यांनी सिंगल आणि डबल या बॅडमिंटन खेळामध्ये आयएमएस स्कूलच्या विद्यार्थ्यांना २/१ फरकाने हरवले.

या संघामध्ये शाळेचे शौर्य बिराजदार, प्रेम काटवे, श्रेयस रायकर, आयुष्म लोया, वीर वेर्णेकर हे विद्यार्थी सहभागी झाले होते. विजयी संघाचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, शाळेचे सचिवा वर्षा विभूते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, प्रि-प्रायमरीच्या प्राचार्या अनिता अनगोंडा यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या संघास शाळेचे क्रीडाविभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव, ऐश्वर्या गिरे तसेच प्रशिक्षक हर्षद यांचे मार्गदर्शन लाभले.

## श्रीवास्तव नाभिक समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा

✔ **सुराज्य/सोलापूर** : श्रीवास्तव नाभिक समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापूर येथील समाज कल्याण केंद्र येथे झाली. अध्यक्षस्थानी समाज अध्यक्ष राजू शुक्लवार हे होते. प्रस्तावना संस्थेचे सचिव सिद्राम रुद्रार यांनी केले. सभेसाठी समाजाचे सभासद निवृत्त आयुक्त अहमदनगर श्रीकांत म्याकलवार, शासकीय सेवेत कार्यरत असलेले विलास मालतुमकर आणि उद्योजक दिलीप रेड्डी उपस्थित होते.

श्रीवास्तव नाभिक समाजाचे वधुवर मेळावा घ्यावा, अशी कल्पना समाजबांधवांनी सुचविले. महर्षी सविता महाराजांचे पूजन समाज अध्यक्ष राजू शुक्लवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष सायबण्णा शेडम, खजिनदार गोवर्धन कोडपाक, सहसचिव महेश श्रीमंगले, संचालक प्रकाश सद्गुरे, सुधीर वड्डेपल्ली, अनिल मालतुमकर, राजकुमार मालतुमकर, नंदकिशोर सद्गुरे, मनोज म्याकलवार, भाग्यवान म्याकलवार हे उपस्थित होते. सूत्रसंचालन माजी अध्यक्ष नंदकिशोर सद्गुरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार राजकुमार मालतुमकर यांनी केले.



## बॉलबॅडमिंटन स्पर्धेत स.हि.ने. प्रशालेचे यश

✔ **सुराज्य/सोलापूर** : सोलापूर महापालिका व सोलापूर क्रीडा परिषदेच्यावतीने आयोजित केलेल्या शालेय बॉलबॅडमिंटन स्पर्धेत सहापैकी पाच गटात यश मिळाले असून दोन गटात श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट मिळवला.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुली व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद मिळाले. १४ वर्षाखालील मुले व १९ वर्षाखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद मिळाले. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेमध्ये प्रत्येक गटात १८ संघांनी सहभाग नोंदवला. १४ वर्षाखालील मुलींच्या गटात नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेचा १५-८,१५-७ असा पराभव केला. शरदचंद्र पवार प्रशालेचा १५-९ १५-८ असा पराभव करत अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरी दमाणी प्रशालेचा ९-१५, १५-१०, १५ -८ असा पराभव करत विजेतेपद पटकावला. नेहा फटफटवाले, श्रावणी खैरमोडे, तनिष्का अंजीखाने, दिशा बाहिरवाडे, लतिका दंडगल, अक्षरा जल्ला यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात स.हि.ने प्रशालेने दमाणी प्रशालेचा १५-११, १५-९ असा पराभव केला गांधीनाथ प्रशालेचा १५-८, १५-९ अशी मात केली श्राविका प्रशालेचा १५-११, १५-९ असा पराभव करत विजेतेपद पटकावला. कोमल बेताळे, सई कळंब, समीक्षा घोरपडे, वैष्णवी मनसावाले, अनन्या गवळी, तन्वी मंठाळकर यांनी सुंदर खेळ केला. क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ दामले, सचिव प्रीती चिलजवार, ज्येष्ठ सदस्य मोहन दाते, प्रमोद कामतकर, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी, रोहिणी कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

## विश्वेश्वरय्यांची कविता पठन केल्याने अभियंता कुलकर्णी यांचे कौतुक

✔ **सुराज्य/सोलापूर** : सोलापूर जिल्हा परिषदेत तीन वर्षानंतर अभियंता दिन साजरा केल्याने तब्बल १६ अभियंतांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी कविता पठण केल्याने सभागृहातून त्यांच्यावर टाळ्यांच्या गजरात कौतुकांचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी अभियंता नरेंद्र खराडे, कार्यकारी अभियंता कार्यकारी अभियंता दिनकर महिंद्रकर यांनी या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर नियोजन केले. होते. सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक नरेंद्र खराडे यांनी केले. ते स्वतः जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक एकचे कार्यकारी अभियंता असतानाही आपल्या भाषणात त्यांनी बांधकाम विभाग क्रमांक दोनचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांचा माझे गुरू म्हणून उल्लेख केला. त्याच वेळी उपस्थितांच्या चेहऱ्यावर हसू तर आलेच. पण गुरू हा शब्द ऐकून संतोष कुलकर्णी यांनी खराडे यांच्याकडे पाहून हात जोडले.

## औरंगाबाद, उस्मानाबाद जिल्ह्यांची नावे अखेर बदलली

### राज्य सरकारच्या राजपत्रात नोंद

✔ सुराज्य/मुंबई

मागील काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारकडून राज्यातील औरंगाबाद व उस्मानाबाद शहरांची नावे बदलण्यात आली. अनुक्रमे छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव अशी या शहरांना नावे देण्यात आली. मात्र शहरांनतर आता जिल्ह्यांचीही नावे बदलण्यात आली आहेत. त्यानुसार, संपूर्ण औरंगाबाद जिल्ह्याचे नाव हे छत्रपती संभाजीनगर करण्यात येणार आहे. याचबरोबर उस्मानाबाद जिल्ह्याचे नाव आता धाराशिव करण्यात येणार आहे.

राज्य सरकारने शुक्रवारी (१५ सप्टेंबर) राजपत्र प्रकाशित काढून दोन्ही जिल्ह्याचे नाव बदलले. त्यामुळे यापुढे उस्मानाबाद जिल्ह्याचे नाव धाराशिव आणि औरंगाबाद जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर असणार आहे. महत्त्वाचे म्हणजे आजची मंत्रिमंडळ बैठक आणि उद्याच्या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमी हा बदल करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. तब्बल सात वर्षांनी छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



मुंबई उच्च न्यायालयात सुरु असलेल्या सुनावणीवेळी राज्य सरकारने आलेल्या आक्षेपांची पडताळणी झालेली नाही असे सांगितले होते. पडताळणी झाली नसताना तुम्ही नावे कशी बदलली अशी विचारणा उच्च न्यायालयाने केली. त्यामुळे तूर्तास औरंगाबादचे नाव औरंगाबाद आणि उस्मानाबादचे नाव उस्मानाबाद जिल्हा असेच ठेवायचे ठरवले होते. ही प्रक्रिया पूर्ण करुन आम्ही विचार करु असे सरकारने सांगितले होते. त्यानंतर शुक्रवारी सरकारकडून राजपत्र जारी करण्यात आले असून उस्मानाबाद आणि औरंगाबाद या संपूर्ण जिल्ह्यांची नावे बदलण्यात आली आहेत. यापूर्वी औरंगाबाद शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद शहराचे नाव धाराशिव करण्यात आले होते. परंतु औरंगाबाद विभाग, जिल्हा, उप-विभाग, तालुका आणि गाव तसंच उस्मानाबाद जिल्हा, उप-विभाग, तालुका आणि गावाचे नाव बदललेले नव्हते. त्यामुळे शहरानंतर इतर नावे शुक्रवारी राज्य सरकारने राजपत्र जारी करुन बदलली.

## भाजपच्या महिला ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी ज्योती पाटील



✔ **पिलीव** : सो. जि. प.च्या माजी सदस्या व नियोजन समितीच्या सदस्या ज्योती पाटील यांची भाजपच्या ग्रामीण जिल्हा महिला आघाडी जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे माळशिरस, सांगोला, माढा, करमाळा या तालुक्यातून ज्योती पाटील यांच्या निवडीचे स्वागत केले जात आहे. ज्योती पाटील यांना राजकीय वारसा लाभला आहे त्यांचेपती केशवराव पाटील हे तीन वेळा पंचायत समिती सदस्य राहिले आहेत.

## ओबीसींच्या आरक्षणात आम्ही वाटेकरी

### देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य चर्चेत

✔ सुराज्य/नागपूर

मराठा आरक्षण द्यायचं असेल तर ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका अशी आक्रमक भूमिका ओबीसी समाजाने घेतली आहे. त्यासाठी विविध आंदोलनंही करण्यात येत आहेत. आजच छत्रपती संभाजी नगरमध्येही आंदोलन करण्यात आलं तसंच नागपूरमध्येही आंदोलन करण्यात येतं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काही वेळापूर्वी नागपूरमध्ये दाखल झाले आहेत. त्यांना याविषयी विचारलं असता ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, असं आश्वासन त्यांनी दिलं आहे.

राज्य सरकारची ही भूमिका आहे की ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. ओबीसींचं आरक्षण आम्ही कमी होऊ देणार नाही. कुणालाही त्यात वाटेकरी होऊ देणार नाही अशी स्पष्ट भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. त्यामुळे ओबीसी बांधवांना आमची विनंती आहे की जे काही आंदोलन त्यांनी सुरु केलं आहे ते मागे घ्यावं.



कुठल्याही प्रकारे आंदोलन करु नये. आज मी संभाजीनगरमध्ये गेलो होतो तिथल्या ओबीसी आंदोलकांचीही भेट घेतली. त्यांनाही मी आंदोलन मागे घेण्याची विनंती केली आहे. माझा विश्वास आहे की ते आंदोलन मागे घेतील. नागपूर आणि चंद्रपूर या ठिकाणी आंदोलनाला बसलेल्या आंदोलकांनाही मी विनंती करणार आहे, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# वारकरी भवन प्रेरणादायी : डॉ. मल्लिकार्जुन महास्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

**वारकरी सांप्रदाय भारताची शान आहे. त्यामुळे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या निधीतून होणारे वारकरी भवन प्रेरणादायी आणि वारकरी सांप्रदायाला दिशा देणारे ठरेल, असे विचार काशीपीठाचे जगद्गुरु १००८ मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांनी मांडले.**

सोलापूर शहर उत्तर मतदार संघातील प्रभाग क्र. ६ मधील दमाणी नगर भागातील गडदर्शन सोसायटीच्या शेजारी असलेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या दहा हजार स्क्वेअर फुट जागेत साकारणाऱ्या वारकरी भवनाचा भूमिपूजन समारंभ शनिवारी दुपारी जगद्गुरु मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते तसेच पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार विजयकुमार देशमुख आणि अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे तसेच हभप प्रकाश महाराज बोधले यांच्या प्रमुख उपस्थितीत अखिल भाविक वारकरी मंडळाच्यावतीने पार पडला. यावेळी जगद्गुरु मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी बोलत होते. आमदार विजयकुमार देशमुख यांनी या वारकरी भवनासाठी १ कोटी १५ लाख रुपयांचा निधी दिला आहे. वर्षभरात हे काम पूर्ण होणार आहे. पंढरीचा वारकरी साक्षात पांडुरंग म्हणून भक्तांच्या सेवेला हजर होतो आणि या वारकऱ्यांसाठी सोलापुरात होत असलेले वारकरी भवन सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. आमदार विजयकुमार देशमुख यांनी समस्त वारकऱ्यांना दिलेला शब्द वारकरी भवनच्या माध्यमातून पूर्ण केला आहे. त्यामुळे वारकरी भवन पूर्ण झाल्यानंतर खऱ्या अर्थाने याचे भव्य आणि दिव्य स्वरूप सर्वांसमोर येईल. तीन मजली वारकरी भवन असावे अशी इच्छा व्यक्त करत वारकरी भवन हे भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम ठरेल, असेही महास्वामी यावेळी बोलताना म्हणाले.

आजचा दिवस वारकऱ्यांच्या जीवनात सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखा दिवस आहे.

## वारकरी भवनाचे थाटात भूमिपूजन



वारकरी कधीही कोणतीही अपेक्षा करत नाही. परंतु वारकऱ्यांसाठी देणाऱ्याने तन-मन-धनाने पुढे आले पाहिजे, म्हणून आमदार विजयकुमार देशमुख वारकरी भवनासाठी पुढे सरसावले आणि त्यांनी सव्वा कोटींचा निधी वारकरी भवनाला दिला, असे गौरवोद्गार पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी काढले. हभप प्रकाश बोधले महाराज यांनी आमदार विजयकुमार देशमुख यांचे ऋण व्यक्त करत वारकरी भवनाच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या सेवेला हातभार लावल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष किरण देशमुख, संजय कोळी, ज्योतीराम चांगभले, भागवत महाराज चवरे, जगन्नाथ देशमुख महाराज, मोहन शेळके, लहू गायकवाड, रेखा गायकवाड, सुनील खटके, किसन कापसे, बसवेश्वर जाधव, सुरेश पोखरकर, नागेश खरात, शिवदास चटके, किरण पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. अखिल भाविक वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष संजय पवार यांनी सूत्रसंचालन केले. तर नागनाथ पाटील यांनी आभार मानले.

### वारकरी, साक्षात विठ्ठलच !

पंढरीचा वारकरी हा केवळ वारकरी नव्हे, तर साक्षात पंढरीचा श्री विठ्ठलच आहे. वारकरी भवनाच्या माध्यमातून श्री विठ्ठलाची सेवा करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे. सध्या १० हजार स्क्वेअर फुट जागेत होत असलेले वारकरी भवन आणखी भव्य आणि दिव्य होण्यासाठी निधीसह जागेची सुद्धा कमतरता पडू देणार नाही. हे वारकरी भवन मूर्तीमंत उदाहरण ठरेल.

**- विजयकुमार देशमुख, आमदार.**

### अमोल शिंदे यांच्यातर्फे वारकरी भवनला २५ लाखांचा निधी

'वारकऱ्यांसाठी दमाणी नगर भागात वारकरी भवन होण्यासाठी सव्वा कोटींचा निधी आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिला आहे. वारकरी भवनाचे प्रवेशद्वार आणि अन्य विकास कामांसाठी आपण २५ लाख रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी यावेळी केली. १० हजार स्क्वेअर फुट जागा कमी पडते. त्यामुळे या ठिकाणी शिल्लक असलेली सर्व जागा वारकरी भवनासाठी घेऊन देखणे वारकरी भवन होण्यासाठी आपण प्रयत्न करू', असेही अमोल शिंदे म्हणाले.

CMYK




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




दै. सुराज्यच्या आजच्या अंकासोबत राजवर्ष ही वर्धापनदिनाची विशेष पुरवणी देत आहोत.
आजचा अंक ८ + ४ आहे
– संपादक



# 'कॅबिनेट'वरून रंगला कलगीतुरा

## सत्ताधारी–विरोधकांमध्ये झडल्या आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मराठवाड्याची राजधानी संभाजीनगर (औरंगाबाद) येथे शनिवारी झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीवरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात पुन्हा संघर्ष सुरू झाला आहे. एकमेकांवर आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी बैठकीनंतर झडल्या. विरोधी पक्षांनी सत्ताधारी पक्षावर एक ना अनेक आरोप केले. बैठकीच्या खर्चाचा मुद्दा पुढे आणला गेला. फडणवीस सरकारच्या काळातील बैठकीच्या निर्णयांचे काय झाले? असा सवालही विचारला गेला. ही बैठक नसून केवळ राजकीय उत्सव होता,असा हल्ला शरद पवार गटाकडून शिंदे सरकारवर चढवला गेला. आमच्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार आले. पुढे त्यांची जबाबदारी होती तेव्हा उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षांमध्ये काय माशा मारल्या का? असा प्रतिसवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विचारला. मराठवाड्याच्या प्रश्नांविषयी आपण स्वत: प्रेसमध्ये जावून प्रश्न विचारू असे म्हणणाऱ्या संजय राऊतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगलेच फटकारले. बैठकीनंतर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कलगीतुरा भलताच रंगला.**



छ.संभाजीनगरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रीमंडळाची बैठक झाली.बैठकीच्या अगोदरपासून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवायला सुरूवात केली.बैठकीवर अनेक हरकतींचे मुद्दे उपस्थित केले गेले.मंत्रिमंडळाची बडदास्त ठेवण्यासाठी शहरातील पंचतारांकित हॉटेल्स बुक करण्यात आले होते. याचा सारा खर्च अनेक कोटींच्या पुढे असल्याची तक्रार विरोधकांनी केली होती.तरी देखील पूर्वनियाजनाप्रमाणे बैठक पार पडली.

आरोपाची पहिली तार शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी छेडली. दुष्काळी परिस्थितीत मंत्रिमंडळ बैठकीला उत्सवाचे रूप दिले गेले. मराठवाड्यामध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप पीक हातातून गेले आहे. पंचनामे अजून झालेले नाहीत, दुष्काळ जाहीर केलेला नाही, शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या जिल्हा बँका आर्थिकरीत्या सक्षम नाहीत. त्यामुळे शेतकरी त्रस्त आहे. पुढची पिढी शेती करणार का? इतका गंभीर प्रश्न असल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले आहे.शेतकरी आत्महत्येचे प्रमाण हे मराठवाड्यात सर्वात अधिक आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये बीड जिल्ह्यात १८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ही मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याची स्थिती आहे. याकडे राज्य सरकारने गंभीरपणे पहायला हवे,असे जयंत पाटील म्हणाले.

काम करणाऱ्या सरकारबाबत उगाच कुणी कोल्हेकुई करू नये, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश भाजपचे अध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. राज्य सरकार मराठवाड्याकडे दुर्लक्ष करीत असल्याच्या विरोधकांच्या टीकेला आमदार बावनकुळे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विदर्भ व मराठवाड्याकडे किती लक्ष दिले, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

उगीच कोल्हेकुई कशासाठी? मराठवाड्यासाठी घेण्यात येणारी बैठक कोणत्या ठिकाणी होत आहे, यावर वायफळ चर्चा करण्यापेक्षा त्यातून काय निष्पन्न होते, हे बघणे महत्त्वाचे आहे. विदर्भ व मराठवाड्यातील अनेक समस्या असताना महाविकास आघाडीला सत्तेवर अशी विशेष बैठक घेण्याचे शहाणपण का सुचले नाही, अशी विचारणा आमदार बावनकुळे यांनी केली.

### राऊतांना टोला...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांना भर पत्रकार परिषदेत टोला लगावला.शिवसेनेच्या मुखपत्रातून सरकारला अनेक प्रश्न विचारले गेले.त्याचा उल्लेख शिंदे यांनी यावेळी केला. पत्रकार परिषद सुरु होण्यापूर्वी राऊत आले नाहीत का? असा प्रश्न एकनाथ शिंदेंनी विचारला. मी संपादक आहे मी पत्रकार परिषदेत जाऊ शकतो असे संजय राऊत म्हणाले होते. त्यावरुन हा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी विचारला. त्यावेळी एकच हशा पिकला. दरम्यान महागडे सूट घेतल्याबद्दल शिंदे यांच्यावर टीका झाली.त्यानंतर त्यांनी आपला मुक्काम शासकीय विश्रामगृहात हलवला.

### त्या घोषणांचे काय झाले?

मराठवाड्यातील मागच्या फसवणुकीवर त्यांनी सरकारला उघडे पाडले आहे. ''यापूर्वी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१६मध्ये संभाजीनगरात मंत्रिमंडळाची बैठक घेऊन साधारण ५० हजार कोटींच्या घोषणा केल्या होत्या. त्या घोषणांचे काय झाले?'' असा प्रश्न ठाकरे गटाचे अंबादास दानवे यांनी विचारला आहे.

### फडणवीसांचा हल्लाबोल

मराठवाड्यासाठी वॉटर ग्रीड संदर्भात आपण मान्यता दिली होती. आठ पैकी एका जिल्ह्याचे टेंडर काढून कामही सुरू केले होते. परंतु, दुर्देवाने प्रश्न विचारणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या सरकारने वॉटर ग्रिडचा खून केला. त्याचा मुडदा पाडला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.हे आम्हाला माहीत नाही. पण आपले सरकार आल्यानंतर 'हर घर जल' च्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निधी दिला आहे. आमच्याकडून जर एखादा निर्णय मागे राहिला असेल तर तो पूर्ण करण्याची जबाबदारी तुमची(ठाकरे सरकार) होती. तुम्ही अडीच वर्षे माशा मारत होतात का? असा संतप्त सवालही फडणवीस यांनी उपस्थित केला.

# बार्शी तालुका व सोलापूर जिल्हा दुष्काळी जाहीर करा

## अखिल भारतीय किसान सभेची मोर्चाद्वारे मागणी

✔ सुराज्य/बार्शी

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने भगवंत मैदान येथून बार्शी तालुका व सोलापूर जिल्हात तातडीने दुष्काळ जाहीर करावा या मुख्य मागणीसह इतर मागण्या घेऊन शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा कॉम्रेड प्रा.तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला.

मोर्चा तहसीलवर पोहचताच तेथे सभेत रूपांतर झाले. यावेळी कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे म्हणाले, देशात काळ कठीण आहे. सरकार स्पष्टपणाने सामान्य जनतेला फसवत आहे. अशात दुष्काळ पडला आहे. शेतकरी मरत असताना सरकारला त्याचे काही देणे घेणे नाही. दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकऱ्याला सरकारच्या दारात धडका घ्याव्या लागत आहेत. पुढील काळात दुष्काळ जाहीर न केल्यास सरकारला आंदोलनांनी हैराण करून टाकू. या दुष्काळाच्या




मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी, अंशकालीन स्त्री परिचर, डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघ, बांधकाम कामगार संघटना, बानपा सफाई कामगार संघटना उपस्थित होत्या. मोर्चाचे निवेदन तहसीलदार एफ आर शेख यांनी स्वीकारले. मोर्चा यशस्वी करण्यासाठी कॉ. लहू आगलावे, लक्ष्मण घाडगे, धनाजी पवार , ए बी कुलकर्णी, प्रवीण मस्तुद, अनिरुद्ध नखाते, शौकत शेख, अण्णा उंबर, चंद्रकांत लोंढे, राजेंद्र आगलाव, दादा भोसले, रामा जाधव, बालाजी शितोळे, आनंद धोत्रे, भारत भोसले, आनंद गुरव, सुरेश कांबळे, रशीद इनामदार, सतीश गायकवाड, मुबारक मुलांनी, पांडूरंग यादव, सुवर्णा नंदाणे, शितल करडे, शोभा पवार, आनंद गुरव, अब्बास बागवान, सुवर्णा कांबळे, रंजना हांडे, तानाजी जगदाळे, दशरथ भालके, जयराम सराफ, भारत चव्हाण आदी उपस्थित होते.

### मोर्चाद्वारे करण्यात आलेल्या मागण्या

बार्शी तालुकात व सोलापूर जिल्हात तातडीने दुष्काळ जाहीर करा. दुष्काळाचे सर्व फायदे द्या. पिण्याच्या पाण्याची जनावराच्या चाऱ्याची सोय करा. पिक विम्यासाठी वगळलेले दोन मंडळे खांडवी व बार्शी यांचा समावेश करावा. कांद्याचे अनुदान एकरकमी द्या. संपूर्ण कर्जमाफी दया. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करा. पेन्शन दया. चालू खरिपाची संपूर्ण नुकसान भरपाई दया. पहिल्या पिक विम्याचे व आत्ताच्या पिक विम्याचे पैसे दया. शेतीमालाला उत्पन्नाच्या खर्चावर हमीभाव दया. मागेल त्या ठिकाणी शेतकऱ्यांना काम व बेरोजगारांना बेरोजगार भत्ता दया. न्यायाच्या कुठल्याही आंदोलनावरची चालू असलेली दडपशाही बंद करा. शेतकऱ्यांना मोफत वीज दया. दुष्काळामुळे विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची फी माफ करा या मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या.

# वनस्पतीच्या बिया खाल्ल्याने विद्यार्थी अत्यवस्थ

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील सादेपूर इथल्या शाळेमध्ये नऊ शाळकरी विद्यार्थ्यांनी जेट्रोपा वनस्पतीच्या बिया खाल्ल्यामुळे उलट्या झाल्या. या विद्यार्थ्यांना मंद्रूप आरोग्य केंद्रामध्ये प्राथमिक उपचार करून सर्वांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. दरम्यान प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले यांनी याबाबत माहिती देताना सर्व विद्यार्थी धोक्याच्या बाहेर असल्याचे सांगून सर्वांचे प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले.

प्रशांत श्रीमंत लोहार वय १०, राजू शिवाजी जाधव वय १०, रोहन काशिनाथ बुगडे वय ९ वर्ष, श्रीकृष्ण दौलत कोळी वय ९ वर्ष, मोहन महादेव जाधव वय ९ , अविनाश कसपा बोरखडे वय ९ वर्ष, स्वप्नील सुरेश पांढरे वय १० वर्ष, समर्थ संजय भोई वय ९ वर्ष, समर्थ श्रीमंत लोहार वय ९ अशी विद्यार्थ्यांची नावे आहेत. १५ सप्टेंबर रोजी ही घटना घडली. शाळेत मुले खेळत असताना शेजारी असलेल्या जेट्रोपा वनस्पतीच्या बिया त्यांनी खाल्ल्या. या बिया खाताच या सर्व विद्यार्थ्यांना उलट्या होऊ लागल्या. त्यांना तात्काळ ॲम्बुलन्सच्या भंडारकवठे लोकेशनच्या डॉ. संदीप चव्हाण आणि पायलट सुभाष नानाजे यांनी मंद्रूप या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयात उपचार करून सर्व विद्यार्थ्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून आता सर्व विद्यार्थ्यांच्या तब्येतीमध्ये सुधारणा होत असल्याचे सांगण्यात आले.

# ग्रामसेवकास कार्यालयात मारहाण; शासकीय कामात अडथळा केल्याचा गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

इलेक्ट्रिक कामाचे पैसे वेळेत का दिले नाही ? या कारणावरून कार्यालयात घुसून ग्रामसेवकास मारहाण करून कार्यालयात आदळ आपट केल्याची घटना हळदुगे (ता.बार्शी) येथील ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली.

विश्वनाथ दत्तात्रय माहोरे (वय ३५ रा.बार्शी) असे जखमी ग्रामसेवकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विलास यशवंत जगताप (वय ३५ रा.हळदुगे) याच्या विरुद्ध वैरागच्या पोलिसांनी शासकीय कामात अडथळा आणि तोडफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. विश्वनाथ माहोरे हे काल दुपारी ग्रामपंचायत कार्यालयात काम करीत होते. त्यावेळी इंद्रजीत देशमुख याच्यासोबत आरोपी विलास जगताप आला होता. देशमुख यांनी इलेक्ट्रिक कामाचे पैसे मागितले. त्यावेळी ग्रामसेवकांनी त्याला थोडे थांबा असे सांगितले. तेंव्हा विलास जगताप याने आत्ताच्या आत्ता पैसे दे, असे म्हणून गच्ची पकडून त्यांना हाताने मारहाण करून ढकलून दिले. आणि फर्निचरची आदळ आपट केली. त्यात संगणकाचे नुकसान झाले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . फौजदार पवार पुढील तपास करीत आहेत.



भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल के. के. प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ केंगनाळकर यांचा सत्कार करताना सिध्देश्वर देवस्थान कमिटीचे अध्यक्ष धर्मराज कडादी व इतर.

### लक्ष्मी मार्केट येथे तलवारीने मारहाण

✔ सोलापूर : आपल्या भंगार दुकानना समोर थांबले असता शिवीगाळ करून तलवार आणि लोखंडी अँगलने केलेल्या मारहाणीत हसन अल्लाउद्दीन शेख (वय ४६ रा.सिद्धेश्वर पेठ) हे जखमी झाले. ही घटना लक्ष्मी मार्केट येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली.त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हसन शेख हे काल दुपारी आपल्या दुकानावर समोर थांबले होते. त्यावेळी युसूफ चांदसाहेब शेख, आयान शेख आणि इतर दोघांनी दुकानाजवळ येऊन त्यांना शिवीगाळ केली. त्याचा जाब विचारले असता त्यांनी मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



उजनीचं काय न्हाय इशेश !

कल्याण
290-12-237

# राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे

✔ सुराज्य/मुंबई

भारतीय हवामान विभागाकडून आगामी पाच दिवसांसाठी राज्यातील विविध जिल्ह्यांना हवामानाचे इशारे दिले आहेत.

राज्यात पुढील पाच दिवसात प्रामुख्यानं कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. हवामान विभागनं विविध जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट, यलो ॲलर्ट जारी केले आहेत. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे नंदुरबार, कोकणातील ठाणे आणि पालघर जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट देण्यात आले आहेत.

यंदाच्या मान्सूनच्या हंगामात राज्यात पावसानं पुरेशा प्रमाणात हजेरी लावलेली नाही. त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसह सर्वांना सप्टेंबर महिन्यात चांगल्या पावसाची अपेक्षा होती. आज भारतीय हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र विभाग मुंबई यांच्या वतीनं पुढील पाच दिवसांसाठी म्हणजेच १६ ते २० सप्टेंबरच्या काळातील पावसाचे इशारे जारी केले आहेत.

**१७ सप्टेंबरला कशी असेल पावसाची स्थिती?**

भारतीय हवामान विभागानं उद्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट जारी केला आहे. तर, नंदुरबार, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, रत्नागिरी, सातारा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना यलो ॲलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांसह धुळे आणि जळगाव मध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, हवामान विभागानं मुंबईला १६ ते १८ सप्टेंबर या तीन दिवसांसाठी यलो ॲलर्ट जारी केला आहे. १८ सप्टेंबरला राज्यात मुंबईसह पालघर, ठाणे, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूरमध्ये पावसाची शक्यता आहे. तर, याच दिवशी रत्नागिरीला यलो ॲलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळं रत्नागिरी जोरदार पावसाची शक्यता आहे. १९ आणि २० सप्टेंबरला राज्यात विविध ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर,या दोन दिवसांमध्ये रत्नागिरी आणि रायगडमध्ये जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे

### आज उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट

आजच्या दिवशी हवामान विभागानं उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्याला ऑरेंज ॲलर्ट जारी केला आहे. या ॲलर्टनुसार या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांमध्ये वेगवान वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात जोरदार पावसाची शक्यता आहे. तर, पालघर, ठाणे, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांना यलो ॲलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये विविध ठिकाणी मुसळधार पावसची शक्यता आहे.



CMYK

# सामाजिक उपक्रम राबवून गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करा

## जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांचे आवाहन



✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वच समाजाचे सण, उत्सव एकत्र येऊन आनंदाने साजरे करतात व जातीय सलोखा अबाधित ठेवतात. हीच परंपरा कायम ठेवून, गणेशोत्सव तसेच अन्य आगामी सण उत्सव साजरे करावेत. आगामी गणेशोत्सव करताना गणेशोत्सव मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवून पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले आहे.**

श्री गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर रखुमाई सभागृह, पोलीस संकुल पंढरपूर येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सुशील बेल्हेकर, मुख्याधिकारी अरविंद माळी, वीज वितरणचे उप कार्यकारी अभियंता भोळे, उपविभागीय अभियंता भीमाशंकर मेटकरी, पोलीस निरीक्षक अरुण फुगे, मिलिंद पाटील , गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक सरदेशपांडे म्हणाले, 'गणेशोत्सवात पारंपरिक वाद्यांचा वापर करावा ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा पाळावी. पोलीस प्रशासन सर्वांसाठी सज्ज आहे. लागणारी आवश्यक ती मदत पोलीस प्रशासनाकडून करण्यात येईल. पंढरपूर शहरातील नगरपालिका, महावितरण पोलीस प्रशासन यांनी शहरातील संयुक्त पाहणी करून आवश्यक ठिकाणी तात्काळ सुविधा उपलब्ध कराव्यात. नागरिकांनी समाज माध्यमातून जातीय तेढ निर्माण होईल, असे संदेश प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव म्हणाले, 'गणेशोत्सव मंडळांनी कागदपत्रांची पूर्तता करून आवश्यक ती परवानगी घ्यावी. गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणारा मंडप सार्वजनिक जागेत असेल तर त्या संबंधित यंत्रणेची परवानगी घ्यावी. मंडपामुळे रहदारीस अडथळा येणार नाही तसेच संबंधित ठिकाणच्या नागरिकांना अत्यावश्यक सुविधा पुरविण्यासाठी रस्ता मोकळा राहील, याची दक्षता घ्यावी.

### पंढरपूर शहर व तालुक्यात ४२४ गणेश मंडळे

पंढरपूर शहर व तालुक्यात ४२४ गणेश मंडळे असून, आतापर्यंत १०२ गणेशोत्सव मंडळांनी ऑनलाइन परवानगी घेतली आहे. ऑनलाइन परवानगी घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून तत्काळ परवानगी घ्यावी. तात्पुरती वीज जोडणी घेण्यासाठी वीज वितरण कंपनीकडे मागणी करावी, आवाजाची मर्यादा पाळावी, ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी. गणेशोत्सव शांतता व सौहार्दाच्या वातावरणात पार पाडावा व त्यासाठी सर्व मंडळांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांनी केले आहे.



## प्रत्येक क्षेत्राला जोडणारा सेतू म्हणजे हिंदी भाषा : डॉ. इंगळे

✔ **सोलापूर :** 'भारत हा जगाचे प्रतिनिधित्व करणारा देश आहे. भारतात अनेक प्रकारची विविधता पहावयास मिळते. अनेक भाषिक लोकांचे वास्तव्य भारतामध्ये आहे. या सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य हिंदी भाषा करते. प्रत्येकाने हिंदी भाषेचे ज्ञान आत्मसात करून व्यवहारात उपयोग केला पाहिजे. प्रत्येक क्षेत्राला जोडणारा सेतू हिंदी भाषा आहे', असे प्रतिपादन बँक ऑफ इंडियाचे माजी राजभाषा अधिकारी डॉ. अरुणकुमार इंगळे यांनी केले.

वसुंधरा कला महाविद्यालयात हिंदी विभागाच्यावतीने हिंदी पंधरवडाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सफलतेसाठी हिंदी विभाग प्रमुख डॉ. सुचिता गायकवाड यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविकात डॉ. संगीता भोसले यांनी केले. आभार सृष्टी कांबळे हिने मानले. सूत्रसंचालन मंगल शिवशरण हिने केले. कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



## संगमेश्वर महाविद्यालयात रक्तदान शिबीर

✔ **सोलापूर :** संगमेश्वर कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने कर्मयोगी कै. आप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात ३९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी डॉ. उषा जमादार यांनी रक्तदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. याप्रसंगी दमाणी ब्लड बँकेच्या डॉ. ए. ए. थिटे, सिव्हिलच्या डॉ. ऐश्वर्या गवळी, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. आबासाहेब साखरे, सहाय्यक ग्रंथपाल कुलकर्णी, प्रा. अर्जुन धोत्रे, डॉ. सारीपुत्र तुपेरे, इत्यादी प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन करुणा शिंगाड़े तर आभार अश्विनी पांढरे यांनी मानले.



## पी. एस. इंग्लिश कॉलेजमध्ये हिंदी दिवस

✔ **सोलापूर :** पी. एस. इंग्लिश कॉलेजमध्ये हिंदी दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य विलास लेंगरे होते तर व्यासपीठावर प्राचार्य नंदकुमार वारे, माजी प्राचार्य मल्लिकार्जुन सिंदगी, प्राध्यापक रमेश हसापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य विलास लेंगरे यांनी प्रास्ताविक करुन उपस्थित मान्यवरांचे स्वागत सत्कार केले. यावेळी सानिका घोडके, शावस्ती मोरे, साक्षी भोसले, अक्षय जगताप या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले तर श्रावणी चाकोते, स्नेहा भडंगे, विजेता सोनसळे, कौशल्या परमार, खुशी दायमा, सायली चंदनशिवे यांनी कलागुण सादर करुन उपस्थित सर्वांची मने जिंकली. सूत्रसंचालन प्राध्यापिका रुपा गोली यांनी केले. उपस्थितांचे आभार प्राध्यापक दिगंबर लोखंडे यांनी मानले.



## पिलीव येथे अभियंता दिवस साजरा

✔ **पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील महावितरण शाखा कार्यालयात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची जयंती साजरी करून अभियंता दिवस पार पडला. प्रारंभी भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन सहाय्यक अभियंता प्रदीप थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वरिष्ठ तंत्रज्ञ सत्यशील गायकवाड, कृष्णदेव काळे, अक्षय मेश्राम, सतिश पारसे, शाहरुख मुलाणी, वैभव टिपरे, अमीर शेख, रामचंद्र एकतपुरे, नितीन वाघमारे, अश्विनी लेंगरे, पत्रकार दामोदर लोखंडे, विद्युत ठेकेदार, प्रशांत राजपूत आदी उपस्थित होते. यावेळी पिलीव शाखेचे सहाय्यक अभियंता प्रदिप थोरात यांचाही अभियंता दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.

## दिव्यांग मेळाव्याला सहभागी होण्याचे आवाहन

✔ **सोलापूर :** दिव्यांग मंत्रालय महामंडळ अध्यक्ष आ. बच्चूभाऊ कडू यांच्या विशेष प्रयत्नाने सुरू करण्यात आलेल्या 'शासन दिव्यांगाच्या दारी' या अनोख्या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी सांगोला शहर व तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी सोलापूर येथे बुधवार दि. २० सप्टेंबर रोजी बहुसंख्येने यावे आणि विविध लाभ घ्यावे, असे आवाहन प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष विजय पुरी यांनी केले आहे. सदरच्या बैठकीस उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष रमेश लोखंडे, सांगोला तालुका अध्यक्ष सतीश दिडवाघ, जिल्हा समनव्यक नविद पठाण, तालुका उपाध्यक्ष राहुल दुधाळ, सूरज मंडले, दादा खडतरे, गवळी, बागवान आदी उपस्थित होते.

यावेळी विजय पुरी म्हणाले की, 'आ. बच्चूभाऊ कडू यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांसाठी विविध आंदोलन करून कायम लढा उभारून न्याय दिला आहे. दि. २० सप्टेंबर रोजी सोलापूर येथे दिव्यांग मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याच मेळाव्यात दिव्यांग बांधवांना अनेक प्रकारच्या सोई-सुविधा, दाखले, प्रमाणपत्र आणि अडी-अडचणी सोडवल्या जाणार आहेत. तसेच दिव्यांग बांधवांसाठी स्वतः संवाद साधणार आहेत. यावेळी रमेश लोखंडे, नविद पठाण, सतीश दीडवाघ यांनी मनोगते व्यक्त केली.

## भीमा नदीवर बंधारा बांधणीचे सर्वेक्षण होणार : आ. आवताडे

✔ सुराज्य/मंगळवेढा



'गावप्रमुखांनो विकास कामांच्या पाठपुराव्याला कमी पडू नका, मी विकास करायला निधी कमी पडू देणार नाही. मतदारसंघातील विकास कामांचा अनुशेष भरून काढल्याशिवाय आपण गप्प बसणार नाही, अशी ग्वाही पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे. त्याचबरोबर तामदर्डी येथील भिमा नदीवरील बंधारा बांधणीचे काम लवकरच सुरु होणार असल्याचेही आमदार आवताडे यांनी सांगितले आहे.'

'आमदार आपल्या दारी' या अभियानाद्वारे आमदार आवताडे यांनी तालुक्यातील विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन मंगळवेढा तालुक्यातील गावभेट दौऱ्याच्या अनुषंगाने या गावांना माचणूर, ब्रह्मपुरी, मुंढेवाडी, रहाटेवाडी, तामदर्डी, तांडोर, सिद्धापूर, बोराळे, अरळी, नंदूर, डोणज, भालेवाडी या गावांना भेटी देऊन स्थानिक ग्रामस्थ व नागरिकांच्या अडीअडचणी तसेच विविध समस्या जाणून घेत असताना आ आवताडे बोलत होते.

या दौऱ्यामध्ये जनतेच्या वीज, रस्ता, पाणी आदी प्रश्नांवर आ. आवताडे तोडगा काढत असताना तांडोर येथील बिराजदार डी. पी. शासकीय अनुदानातून निधी मंजूर असतानासुद्धा खाजगी रूपामध्ये पैसे घेतल्याचे गाऱ्हाणे शेतकऱ्यांनी आ. आवताडे यांच्या कानावर घातल्यावर हे पैसे घेणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याची चौकशी करण्याचे आदेश आ. आवताडे यांनी महावितरण विभागाला दिले आहेत.

या दौऱ्यासाठी प्रांताधिकारी बी. आर माळी, तहसीलदार मदन जाधव, गटविकास अधिकारी शिवाजी पाटील, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता दामा, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कोष्टी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिंदे, पोलीस निरीक्षक रणजित माने, सहा. पोलीस निरीक्षक बापूसाहेब पिंगळे, ए. आर. दुर्गुडे, बाल प्रकल्प अधिकारी गारोळे, लघु पाटबंधारे विभाग पारवे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ जानकर पुरवठा विभागाचे पाटील, वन विभागाच्या वाघ, आठवले आदेश शासकीय अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## ब्रिगेडियर अर्जुन मित्रा यांची दयानंद महाविद्यालयास भेट



✔ सुराज्य/सोलापूर

एनसीसी विभागाचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अर्जुन मित्रा यांनी दयानंद महाविद्यालयास प्रशासकीय भेट दिली. संस्थेचे स्थानिक सेक्रेटरी तथा प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे, कमांडिंग ऑफिसर कर्नल राजेश गजराज, सुभेदार अण्णासाहेब वाघमारे, एनसीसीचे प्रमुख अधिकारी कॅप्टन भीमाशंकर व्हनमाने, लेफ्टनंट सुलताना पठाण आदी उपस्थित होते. यावेळी ब्रिगेडियर अरुण मित्रा यांनी एनसीसी छात्रांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे व शिस्तीने प्रशिक्षण पूर्ण करुन सैन्य दलात भरती होण्याचे आवाहन केले. एनसीसीमुळे समाजाला व देशाला एक सुजाण नागरिक मिळू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ए. ओ. कर्नल विक्रम जाधव, सुभेदार मेजर अरुण ठाकुर आदी यांचा सहकार्य लाभला तसेच संतोष पाटील, मोहीम पटेल, अमृता बचुटे, क्षितीज मोरे, दीपक पाटील, सुशांत जानराव, महेश शिंदे, प्रथमेश सुरवसे, शाहू डोंगरे, भूषण खंडागळे, मोशन पटेल व मयुर जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## नॅशनल गेमसाठी महाराष्ट्र खो-खो संघाची मंगळवारी निवड चाचणी

### सोलापुरातील खेळाडूंना आवाहन

सोलापूर शहर व जिल्ह्यातून २ पुरुष व २ महिला खेळाडू पाठविण्यात येणार आहेत. इच्छुक खेळाडूंनी आपली नोंदणी मोबाईल नंबरसह सोलापूर म्युचर खोखो असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे (९८८११३३१०३) यांच्याकडे व्हाट्सअप मेसेजद्वारे रविवारी (१७ सप्टेंबर) सकाळी दहा वाजेपर्यंत करावी, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी केले आहे.

✔ सुराज्य/सोलापूर

३७ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (नॅशनल गेम) २५ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत गोवा येथे होणार आहेत.

या स्पर्धेत महाराष्ट्राचे पुरुष व महिला खो-खो संघ सहभागी होणार आहेत. त्याकरिता मंगळवार दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ८ पासून श्री तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे मैदान निवड चाचणीचे आयोजन केले आहे.

उस्मानाबाद येथे ५५व्या पुरुष महिला राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू तसेच हिंगोली येथे झालेल्या ५८ व्या पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतील क्रमवारीतील पहिल्या एक ते चार जिल्हा संघटनांनी प्रत्येकी चार पुरुष व चार महिला तर उर्वरित जिल्हा संघटनाने प्रत्येकी दोन पुरुष व दोन महिला खेळाडू आपल्या शिफारस पत्रासह मैदान निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी पाठवावेत, अस कळविले आहे.

## पंढरीनाथ (नंदकुमार) जेऊरकर यांचे निधन



✔ **सोलापूर :** पंढरीनाथ (नंदकुमार) रंगनाथ जेऊरकर (वय-६७) यांचे शुक्रवार (दि. १५ सप्टेंबर) रोजी बंगळुरू येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, जावई असा परिवार आहे.

## बाप्पांच्या नैवेद्यासाठी बाजारात विविध पदार्थांची रेलचेल

✔ सुराज्य/सोलापूर

लाडक्या गणरायाचे आगमन चार दिवसांवर आले आहे. प्रत्येक गल्लीत, घराघरात तयारीला वेग आला आहे. गणपती बाप्पा घरी आणि मंडपात विराजमान झाले की, पाच दिवस सकाळी आणि रात्रीच्या आरतीला प्रसादासाठी काय गोड द्यायचे याचेही नियोजन केले जात आह. त्यासाठी बाजारात बाप्पाच्या नैवेद्यासाठी गोडाधोडाच्या पदार्थांची रेलचेल सुरू आहे. गणेशाचे आवडते मोदक विविध चवींमध्ये दाखल झाले आहेत. बाप्पाच्या नैवेद्याला गोडवा आणणाऱ्या पदार्थांनी बाजारपेठ सज्ज झाली आहे.



गणरायाबरोबरच घरोघरी बसवल्या जाणाऱ्या गंगागौरींच्या शिदोरीलाही मिठाई व गोडाधोडाच्या पदार्थांची खरेदी केली जाते. यामध्ये बालूशाही, म्हैसूरपाक, गुलाबजामून, रवा लाडू, बेसन लाडू, बुंदी लाडू, खाजा, तिखट वड्या यांची प्रचंड मागणी वाढत असल्याने बाजारपेठ अशा पदार्थांनी सजली आहे.

पूजा आणि आरती ही मोदकाच्या प्रसादाशिवाय पूर्ण होतच नाही. त्यामुळे बाजारातील स्वीट मार्ट विविध प्रकारच्या मोदकांची विक्री करण्यासाठी भक्तांच्या प्रतीक्षेत आहेत. मोदकामध्ये पारंपरिक खव्याचे मोदक तर आहेतच; पण त्याचबरोबर पिस्ता, चॉकलेट, काजू, आंबा, गुलकंद, स्ट्रॉबेरी, पायनापल अशा फ्लेवरमधील मोदकांची दुकाने सजली आहेत. मोदकांबरोबरच लहान मुलांना आवडणारे चॉकलेट व ड्रायफ्रूट मोदकांनीही लक्ष वेधून घेतले आहे. सार्वजनिक मंडळांच्या गणपतीला प्रसाद प्रकारची मिठाई बाजारात उपलब्ध आहे. काजूकतली, कलाकंद, खवा बर्फी, सोनपापडी या गोड पदार्थांना गणपतीच्या प्रसादासाठी विशेष मागणी आहे. त्याचबरोबर बंगाली चवींच्या मिठाई खरेदी करण्याकडेही कल आहे. गेल्या काही वर्षांत गणपतीच्या प्रसादाला तिखट पदार्थ खास आणले जातात. यामध्ये मिनी बाकरवडी, तिखटपुरी, पालकपुरी, चिलीमिली, मेथीखारी, खाकरा हे पदार्थही बाप्पाच्या प्रसादाला नैवेद्य म्हणून खरेदी केले जात आहेत.

## अभियंत्याला सर्व क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देता आले पाहिजे : प्रा. दिवेकर

✔ सुराज्य/पंढरपूर

'इंजिनिअर्स हे लढाऊ योद्धे असतात. ते समाजातील समस्या आपल्या बौद्धिक क्षमतेने सोडवत असतात. त्यासाठी त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पुस्तकी ज्ञानासोबतच प्रात्यक्षिकावर भर देऊन पूर्ण करणे आवश्यक आहे. अभियांत्रिकीमधील प्रत्येक शाखा महत्वाची आहे. फक्त प्रत्येक शाखेचे महत्व लक्षात आले पाहिजे. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर बाहेरच्या विश्वात वावरताना प्रत्येक प्रश्न हे तुम्हालाच सोडवावे लागतात. त्यासाठी आपण कोणत्याही क्षेत्रात जा, त्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देता आले पाहिजे', असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रा. नारायण दिवेकर यांनी केले.



गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयात 'अभियंता दिन' आणि ऑलम्पस २ के २३' या तांत्रिक स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दिवेकर हे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे होते. प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, आपण 'बेस्ट' च्या दिशेने वाटचाल करताना स्वतः ला जे योग्य वाटते, त्या क्षेत्रात ध्येय निश्चित करा, आपल्यामधील योजना, संकल्पना यांना योग्य वाव द्या, असे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी अभियंता आणि करिअर याबाबत अनेक प्रश्न विचारले असता प्रा. दिवेकर आणि व प्राचार्य डॉ. रोंगे यांनी त्यांची उत्तरे दिली.

'ऑलम्पस २ के २३'च्या निमित्ताने जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांमधील विद्यार्थी कॅम्पसमध्ये विविध प्रकल्पांच्या सादरीकरणाची तयारी करत होते. या निमित्ताने सर्व विभागात अत्याधुनिक प्रकल्प, मशीन्स, ब्रीज, बांधकामाचे नमुने यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. हे प्रदर्शन पाहण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी केली होती.

यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त विजय शेलार, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त बी. डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, 'ऑलम्पस २ के २३' चे समन्वयक प्रा. डी. टी. काशीद, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. गजानन वाघमोडे, तृप्ती कदम व सांस्कृतिक विभाग व संवाद प्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर 'ऑलम्पस २ के २३' च्या सहसचिव सोनाली करविर यांनी आभार मानले.

## दीनदयाळ दंत महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीचा निर्णय

✔ **सुराज्य/सोलापूर :** केगाव येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगार वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. एप्रिल २०२३ पासून ही पगारवाढ लागू राहणार आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. चेअरमन खा. प्रीतम मुंडे यांचे कामगार नेते अशोक जानराव यांनी आभार मानले.

केगाव येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातील सुमारे ४५ कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीसह इतर मागण्या संदर्भात संस्थेच्या चेअरमन खा. प्रीतम मुंडे यांच्या समवेत दि. ४ सप्टेंबर २०२३ रोजी बैठक पार पडली होती. त्यावेळी कामगार नेते अशोक जानराव यांनी या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीसह विविध मागण्या मांडल्या होत्या. त्यास खा. मुंडे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत एक सप्टेंबर रोजी संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगार वाढीचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन खा. प्रीतम मुंडे यांनी दिले होते. त्यानुसार करार व नियमावलीस मान्यता देण्यात आली.

पगारवाढीचा निर्णय घेण्यात आला असून ही पगारवाढ एप्रिल २०२३ पासून लागू राहणार आहे. कामगार ते कार्यालयीन अधीक्षक यांना ४ हजार ते १२ हजार रुपये पगार वाढ केली आहे. पुढे पगारामध्ये दरवर्षी मूळ वेतनामध्ये शंभर रुपये वाढ करण्यात येणार असल्याचे करारात नमूद केले आहे. यावेळी प्राचार्य राजेंद्र बिरंगणे, कामगार नेते अशोक जानराव, कार्यालयीन अधीक्षक चन्नवीर चिट्टे, प्रसन्न माने, संतोष कुंभारे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान कामगार नेते अशोक जानराव यांनी चेअरमन खा. मुंडे यांचे आभार मानले आहे.

# सूरत-चेन्नई महामार्ग वैराग ट्रम्पेटसाठी चौ.मी. दराने भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणार : जिल्हाधिकारी

✔ सुराज्य/सोलापूर

नियोजित सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गावरील वैराग येथील ट्रम्पेटसाठी चौरस मीटर दराने भूसंपादन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार असून या प्रस्तावावर ७ ऑक्टोबरपूर्वी निर्णय होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

शनिवारी, जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. या बैठकीस बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत व वैराग येथील दहा गटातील शेतकरी उपस्थित होते. वैराग येथील ट्रम्पेटकरिता भूसंपादनासाठी हेक्टरप्रमाणे दर न देता चौरस मीटरप्रमाणे दर देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली.

शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेत तातडीने दरवाढीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याचा निर्णय यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. नवा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर झाल्यानंतर पंतप्रधान कार्यालयातील तपासणी पथक सोलापूरला येईल. ७ ऑक्टोबरपूर्वी हा विषय मार्गी लावण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी यासाठी संपादित करण्यात येत आहेत. सूरत-चेन्नई महामार्गासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीस सदोष पध्दतीने कमी दर देण्यात येत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे बहुतांश शेतकरी मोबदला नाकारून भूसंपादनास विरोध करीत आहेत. बार्शी तालुक्यातील वैराग, लक्ष्याची वाडी येथील शेतकऱ्यांनी कमी दर मिळत असल्याची तक्रार केली आहे. लगतच्या शेतकऱ्यास स्क्वेअर मीटर दराने दर देण्यात आला आहे. मात्र त्याच्या बाजूलाच असणाऱ्या शेतकऱ्यांना हेक्टरप्रमाणे कमी दर देण्यात आल्याची माहिती यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली.

जमिनीचे दर ठरविण्याचे अधिकार मूल्यांकन विभागाला आहेत. मूल्यांकन विभागाकडूनच जमिनीचे दर ठरविले जातात. त्यामुळे दरवाढीचा निर्णय केंद्र शासनाकडे असल्याची माहिती यावेळी भूसंपादन अधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

बार्शी तालुक्यातील लक्ष्याची वाडी हे गाव बार्शी-परंडा रस्त्यावरील पहिले गाव आहे. गाव बार्शी शहरालगतच आहे. यापूर्वी या गावातील शेतकऱ्यांच्या शेती बिगरशेती झाल्या असून तसे नकाशेही उपलब्ध आहेत. त्यामुळे याठिकाणी यापूर्वीच गुंठेवारी सुरु झाली आहे.

ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे नकाशे नाहीत, त्यांना हेक्टरप्रमाणे गृहित धरून दर देण्यात आले आहेत. यामुळे मोठे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.




### मोदींच्या हस्ते उद्घाटनाचा प्रयत्न

पुढील महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रे नगरमधील घरकूल लाभार्थ्यांना त्यांच्या घराच्या चाव्या देण्यासाठी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात सूरत-चेन्नई महामार्गाच्या कामाचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते करण्याचा प्रयत्न प्रशासनाचा आहे. यासाठी गतीने भूसंपादन करण्यात येत आहे.

### आमदार राऊत यांच्या सूचनेनंतर दरवाढीचा प्रस्ताव

सूरत-चेन्नई महामार्ग व त्यावरील ट्रम्पेटसाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाकरीता शेतकर्‍यांना देण्यात येणारा दर चुकीच्या पध्दतीने काढण्यात आला असून यामुळे शेतकर्‍यांचे नुकसान होत आहे. यासाठी नव्याने दर निश्चित करून दरवाढीबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे तातडीने सादर करण्याची सूचना आमदार राजेंद्र राऊत यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासमोर केली. आमदार राऊत यांची दरवाढीबाबतची सूचना विचारात घेऊन तातडीने तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तरुणावर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : शहरातील एका वसतिगृहात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याबद्दल वसती गहासमोर राहणाऱ्या तरुणाविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. अल्पवयीन पीडित मुलगी ही वस्तीगृहाच्या गेटच्या बाहेर मैदानात खेळण्यासाठी आल्यावर तिच्याकडे वेड्यावाकडे नजरेने पाहणे व हाताने खाणाखुणा करून तिच्या मनास लज्जा वाटेल असे वर्तन केले. त्याचप्रमाणे तिला जातीवाचक शिवीगाळ केल्याचे पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी रशीद बाडीवाले याच्याविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

## रिक्षाची काच फोडून चालकाचे मोबाईल पळवले

✔ **सोलापूर** : रिक्षाची काच फोडून चालकास मारहाण करीत त्याचा मोबाईल आणि पाकीट लुटून नेले. ही घटना सत्तर फूट रोडवर शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. सैपन सत्तार पटेल (वय ३९ रा.आंबेडकर नगर) असे जखमी रिक्षा चालकाचे नाव आहे. त्यांना उचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले सैपन पटेल हे काल रात्री ९ वाजेच्या सुमारास आपली रिक्षा घेऊन सत्तरफूट रोडवरील तिरंगा चिकन दुकान जवळ थांबले होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांना त्यांच्या रिक्षाची काच फोडली. आणि मारहाण करून त्यांच्या खिशातील मोबाईल आणि पाकीट पळवून नेले. या घटनेचे नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.



## सोलापूर ग्रामीणमधील श्वान टेरीने पटकावले सुवर्णपदक

✔ **सोलापूर** : पुण्याच्या रामटेकडी येथील राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २ येथे झालेल्या १८व्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यात सोलापूर ग्रामीणमधील श्वान टेरीने सुवर्णपदक पटकावले आहे.

या स्पर्धेमध्ये कोल्हापूर परिक्षेत्राकडून सोलापूर ग्रामीणच्या बॉम्ब शोधक व नाशक पथकातील श्वान टेरी हिने स्फोटक शोध स्पर्धा प्रकारामध्ये सुवर्णपदक मिळवले आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेकरीता पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, पोलीस उपअधीक्षक (गृह) विजयालक्ष्मी कुर्री तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक दीपक पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

श्वान हस्तक पोलीस हवालदार एस. एस. स्वामी आणि पोलीस हवालदार सी. एस. रायकोटी यांचे पोलीस अधीक्षक सरदेशपांडे यांनी अभिनंदन करुन पुढील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२३ स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

सुराज्य Classified

**पाहिजेत**

व्यंकटेश्वरा मॅटर्निटी होम-सिस्टर, मावशी पाहिजेत.
मो. नं. ९४०५५४४७२२,
(210923)

**CHANGE OF NAME**

I HERBY DECLARE THAT MY OLD NAME DEEPAK KAKA KASTURE HAS BEEN CHANGED TO **DEEPAK KAKASAHEB KASTURE** RESIDING AT 154/153/1-P.NO57, F.NO-401 NIRMITI SAMRUDHI APPARTMENT JULE SOLAPUR, SOLAPUR - 413004 KINDLY NOTE THE SAME.

**CHANGE OF NAME**

I HERBY DECLARE THAT MY OLD NAME MADINABAI AHMEDSAB SATKHED HAS BEEN CHANGED TO **MADINA AHAMADSAB SATKHED** RESIDING AT 273/74, KITTUR CHANAMMA NAGAR, VIJAPUR ROAD, SOLAPUR - 413004. KINDLY NOTE THE SAME.





## संगीता बांगर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**बार्शी** : बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाताचीवाडी येथील उपक्रमशील शिक्षिका संगीता बांगर यांना सोलापूर जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, विविध पदाधिकारी यांच्या उपस्थितीत नुकताच प्रदान करण्यात आला. बांगर यांनी आजपर्यंत विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी शाळेत वर्गसुशोभन, अध्ययन कोपरे, विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास मार्गदर्शन, कौतुक समारंभ, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, वाढदिवस शुभेच्छा, वृक्षारोपण, आरोग्यासाठी चांगल्या सवयी, चित्रकला स्पर्धा, स्वच्छता सप्ताह इत्यादी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. जिल्हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यार्थी, पालक, शिक्षक, अधिकारी, पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## एशियन पेंटच्या अकॅडमीचा समारोप

**अक्कलकोट** : ११ सप्टेंबर पासून लोकापुरे मल्टीपर्पज हॉल येथे सुरू असलेल्या एशियन पेंट च्या प्रशिक्षणाचा १६ सप्टेंबर रोजी कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये पेंटर व्यवसायातील पेंटर बांधवाने एखाद्या पेंट करून घेणाऱ्या कस्टमरची कशा पद्धतीने वागले पाहिजे. कुठल्या पद्धतीने त्याच्याशी व्यवहार ठेवला पाहिजे अशा विविध गोष्टीबद्दल प्रशिक्षणामध्ये शिकवण्याचे काम प्रशिक्षक परेश महाडिक यांनी केले. यावेळभ दररोज कार्यक्रम अटेंड केलेल्या लहुजी पेंटिंग युनियन कामगार संघटनेचे उपाध्यक्ष चंद्रकांत हन्नुरे यांचा सत्कार करण्यात आला. अकॅडमी प्रशिक्षक परेश महाडिकय प्रशिक्षणार्थी सुपरवायझर म्हणून आदित्य सोळसकर यांनी देखील या ठिकाणी चांगल्या पद्धतीचं प्रशिक्षणाचा काम केले. खाजाप्पा गायकवाड ,संजय सरडगी, शिवाजी देडे,अंकुश बेंद्रे, मौला सुतार, देवेंद्र शिंदे ,कृष्णा देडे, सद्दाम शेख, कोळीबेट चे पोलीस पाटील उमेश देडे प्रामुख्याने त्यांची उपस्थिती या ठिकाणी दर्शविली होती.



## लोकविकास स्कूलमध्ये अभियंता दिन साजरा

**वेळापूर** : शिंदे कन्स्ट्रक्शन वेळापूर यांच्या वतीने लोकविकास स्कूल येथे अभियंता दिन साजरा करण्यात आला. अभियंता दिनाचे औचित्य साधून शिंदे कन्स्ट्रक्शन वेळापूर यांच्यावतीने सिव्हिल इंजिनियर राजकुमार शिंदे, गणेश शिंदे, महेश बनकर, दीपक वाघमारे यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला लोकविकास शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, लोकविकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव चंद्रकांत नवले, सुवर्ण संकल्प स्पोर्ट शूटिंग क्लब वेळापूर राष्ट्रीय कोच अक्षय राऊत, लोकविकास जुनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक अमोल पांढरे, लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक अजित बनकर, सागर एकतपुरे ,ताजुद्दीन शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोल साठे यांनी केले.



## शेवट श्रावणमास निमित्त गौडगावात मारुती मंदिरात गर्दी

**अक्कलकोट** : शेवट श्रावणमास निमित्त श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून आली.बोलो विर हनुमान की जय', जय जय बजरंगबली,आशा घोषणांनी गौडगांवच्या मारूती मंदिराचा परिसर शनिवारी दुमदुमून गेला होता.

सोलापूरचे तुकाराम कोरडे श्याम सागट यांच्या वतीने अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन केले होते.तर दुपारची काकड आरतीचा मान ज्योती (रेणुका) जाबा शेडम व महादेव झ्रोळप्पा बिजापुरे ब्रऱ्हाणपुर यांना मिळाला.यावेळी शेकडो भाविकांनी टाळयाच्या गजरात मारुतीचे दर्शन घेतले. श्रावण महिन्यातील शेवट शनिवार असल्याने भाविकांनी गौडगाव येथील दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी पहाटेपासुन मोठी गर्दी केली हाती. मंदिर समितीच्या वतीने दर्शनाची सुलभ केली होती. अन्नछत्र मंडळात महाप्रसाद देणाऱ्या तुकाराम कोरडे व श्याम सगट यांचा सत्कार अन्नछत्र मंडळाच्या वतिने करण्यात आला. यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे,सिद्राम वाघमोडे,प्रकाश मेथें,भारत ननवरे,चौडप्पा सोलापूरे,बिरप्पा पुजारी,परमेश्वर सुतार,ज्ञानेश्वर फुलारी, शांतया स्वामी श्रीमंत म्हेत्रे, श्रीमंत सावळतोट, प्रकाश सनकळ,अमसिद्ध कोरे आदींनी परिश्रम घेतले.

# 'पांडुरंग'ला देशपातळावरील प्रथम क्रमांकाचा बेस्ट को-जनरेशन प्रकल्प पुरस्कार

### कारखान्याच्या चार अधिकाऱ्यांचाही विविध पुरस्कारामध्ये समावेश

**सुराज्य/श्रीपूर**

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्रात पहिल्यांदा को-जनरेशन प्लॅट उभारुन सहकारी साखर कारखान्यामध्ये आदर्श निर्माण केला. को-जनरेशनमध्ये केलेल्या सर्वोच्च कामगिरीचा विचार करुन को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेने कारखान्यास को- जनरेशन प्रकल्पासाठी देशपातळीवरील प्रथम क्रमांकाचा बेस्ट को- जनरेशन प्रकल्प हा पुरस्कार दिला असुन. त्याचे वितरण शनिवारी पुणे येथे खासदार शरद पवार, जयप्रकाश दांडेगावकर, नरेंद्र मोहन, साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ आदी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

कारखान्याच्या वतीने कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे , संचालक भगवान चौगुले, तानाजी वाघमोडे व कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी व अधिकारी उपस्थित होते. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

यावेळी बोलताना चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले कि , को-जनरेशन असोशिएशन ऑफ इंडिया यांनी कारखान्याने हंगाम २०२२-२३ मध्ये केलेल्या उल्लेखनिय कामगिरींच्या जोरावर कारखान्याच्या को-जनरेशन प्रकल्पास देशपातळीवरील प्रथम क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट को-जनरेशन प्रकल्प हा पुरस्कार प्रदान केला आहे. को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडीय या देशपातळीवरील संस्थेने



कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने कमीत कमी बगॅसमध्ये जास्तीत जास्त विज निर्मीती, अंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेले कार्बन क्रेडीट, कमी उत्पादन खर्च, कारखान्यास मिळालेले खड्ज सर्टीफिकेट व कारखान्याच्या असलेल्या सुरक्षा योजना, कारखान्याचा सौर उर्जा प्रकल्प, कमीत कमी पाणी वापर ,पाण्याचा पुर्णवापर, को- जनरेशन प्लँटची क्षमता वापर या सर्व बाबीचा विचार करुन दिला आहे.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी सांगितले कि, कारखान्याची वाटचाल ही श्रध्देय सुधाकरपंत परिचारक यांनी घालुन दिलेल्या आदर्शानुसार चालु असून त्याचे पालन कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक हे तंतोतंत करीत आहेत. ज्यावेळी को-जन प्लँट उभा केला त्यावेळी महाराष्ट्रात को-जनरेशन प्लँटचे प्रमाण खुप कमी होते परंतू श्रध्देय सुधाकरपंत परिचारक यांच्या आशिर्वादाने व कारखान्याचे चेअरमन मा.आ.प्रशांतराव परिचारक व संचालक मंडळाचे सहकार्याने कारखान्याचा को-जन प्लँट यशस्वी चालुन त्यामधुन जास्तीत जास्त विज निर्मीती करुन कारखान्यास आर्थीक उत्पान्नाचा स्त्रोत निर्माण केला आहे. कारखान्याने को-जनरेशनमध्ये केलेल्या सर्वोच्च कामगिरीमुळेच कारखान्यास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेकडुन देशपातळीवरील सर्वोच्च को-जन प्लँट म्हणुन गौरविणेत आले आहे.

कारखान्याबरोबरच कारखान्याचे अधिकारी सचिन विभुते को-जन मॅनेजर यांना बेस्ट को-जन मॅनेजर (स्पेशल), समीर सय्यद बेस्ट इन्स्ट्रुमेंट मॅनेजर, बाळासाहेब होरे यांना बेस्ट इलेक्ट्रीक मॅनेजर तसेच सत्यवान जाधव यांना बेस्ट ई.टी.पी. मॅनेजर असे पुरस्कार मिळाले आहेत. गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये कारखान्याच्या को-जनरेशन प्रकल्पाचे विस्तारीकरण केले असून या हंगामापासून को-जनरेशन प्रकल्प वाढीव क्षमतेने चालणार आहे.

## आंध्रात सोन्याची चोरी; माढा तालुक्यात आरोपीला अटक

**सुराज्य/कुर्डूवाडी**

पामलपोडा नंद्याल आंध्रप्रदेश येथुन सुमारे ४ किलो सोन्याची बॅग लंपास करणाऱ्या चोरट्यास आंध्रप्रदेश पोलिसांनी कुर्डुवाडी पोलिसांच्या मदतीने बारलोणी (ता.माढा) येथून अटक केली. याच्याकडून ९ लाख रुपये रोख व २५ ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले असल्याचे कुर्डुवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी सांगितले.

बाळु गुंजाळ से संशयित आरोपीचे नाव आहे. तर उर्वरित तीन आरोपी फरार असून यांचा शोध सुरू आहे. नंद्याल आंध्रप्रदेश पामलपोडा येथील सोने व्यापारी आपली ४ किलो सोने असलेली बॅग पायात धरुन एस टी बसने प्रवास करत असताना सदर आरोपीने तोंडावर स्प्रे मारून त्याच्या पायामध्ये असलेली ४ किलो सोन्याची बॅग लंपास केली. याबाबत नंद्याल आंध्रप्रदेश येथे गुन्हा दाखल असून सदर तपासाचे धागेदोरे शोधत आंध्रप्रदेशचे पोलिसांचे पथक कुर्डुवाडी पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या बारलोणी येथे पोहचले. तपासात बार्शीचे उपविभागीय अधिकारी नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली कुर्डुवाडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गोपाळ पवार,पोलिस उपनिरीक्षक हनुमंत वाघमारे, पोलिस उपनिरीक्षक संदेश नाळे व इतर कर्मचारी यांनी आंध्रप्रदेश पोलिसांना तपास कामी सहाय्य केले.

### सव्वा ९ लाखांसह सोने जप्त

मिळालेल्या माहितीनुसार सदर आरोपी मोटार सायकलवरून निघाल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांनी तात्काळ त्याला गराडा घालून बारलोणी परिसरात मोटारसायकलवरुन जाताना पकडले. त्याला आंध्रप्रदेश येथे नेऊन कोर्टात हजर करुन पुन्हा तपासासाठी बारलोणी येथे आणले. सुमारे तीन ते चार दिवस कुर्डुवाडी पोलिसांच्या मदतीने आंध्रप्रदेश पोलिसांचा २५ जणांचा ताफा व कुर्डुवाडी पोलिस याचा तपास करत होते. असता सुमार सव्वा ९ लाख रुपये व २५ ग्रॅम सोने पोलिसांनी त्याच्या बारलोणी येथील घरातून व कुर्डुवाडी येथील एका दुकानातून हस्तगत केले.




## वागदरी परमेश्वर आराधना पर्व पालखी महोत्सव गुरूवारपासून

**सुराज्य/अक्कलकोट**

वागदरी येथील ग्रामदैवत श्री परमेश्वर आराधना पर्व पालखी महोत्सव दि,२१ सप्टेंबर पासुन प्रारंभ होणार आहे. त्या निमित्त विविध धार्मिक व सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे माहिती आराधना पंचकमिटीच्या वतीने कळविण्यात आले आहे.



२० रोजी सायंकाळी ७.३० वाजता कंटली पूजनाने पर्व उत्सवाला प्रारंभ होणार आहे. द२१. सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजता श्री च्या मूर्तिस महाभिषेक, सकाळी ११ वाजता म नि प्र शिवलिंग महास्वामी विरक्त मठ वागदरी, गुरुकुल भूषण श्री ष ब्र विश्वराध्य मळेंद्र शिवाचार्य हिरेमठ संस्थान अफझलपूर यांच्या दिव्य सानिध्यात अंबील घागरींची मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर उपस्थित मान्यवराच्या प्रवचन व धर्म सभा होणार आहे.२२ रोजी दुपारी १२ वाजता खा. डॉ जयसिध्देश्वर महाराज यांच्या हस्ते पालखींची महापूजा, त्यानंतर परमेश्वर मंदिरापासून श्री ची मिरवणुक निघणार, रात्री नऊ वाजता भाकणूक होऊन कार्यक्रमाची सांता होणार आहे. या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सुपली येथे महिलेस केस धरून मारहाण; ३ महिलासह ४ जणांवर गुन्हा

**सुराज्य/मंगळवेढा**

सोलापूर -माझ्या पतीला तुझ्या घरात कशाला येऊ देते, या कारणावरून एका महिलेच्या घरात घुसून तिला लाथाबुक्क्या आणि फळीने मारहाण केल्याची घटना सुपली (ता.पंढरपूर) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली.




रंजना बापू वाघमारे (वय ३३ रा.सुपली ) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तिने दिलेल्या फिर्यादीवरून दिपाली श्रीधर वाघमारे, जया गायकवाड ,अनुसया दंदाडे,आणि बालाजी गायकवाड (सर्व रा. सुपली) या चौघांविरुद्ध पंढरपूर ग्रामीणचा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. काल सकाळी ७ वाजेच्या सुमारास वरील सर्वजण रंजना वाघमारे यांच्या घरात न विचारता प्रवेश केला. आणि तिला केस धरून खाली पाडून मारहाण केली. त्यावेळी तिचे पती श्रीधर आणि मुलगी स्वरांजली हे दोघे भांडण सोडण्यात आले असता त्यांना देखील सहभागी मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार कवडे पुढील तपास करीत आहेत.

## मंगळवेढ्यात ११७ मराठा आंदोलकांनी केले रक्तदान

**सुराज्य/मंगळवेढा**

मराठा आरक्षणासाठी मंगळवेढ्यात सकल मराठा समाजाच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनात रक्तरंजित सह्याचे अंगठे व ११७ बांधवानी रक्तदान केले. येथील आंदोलनाला डॉक्टर असोसिएशन व मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने पाठिंबाचे पत्र देण्यात आले.

येथील दामाजी चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलन सुरू आहे या आंदोलनाला शहरातील इतर जातीधर्मीयाचा देखील पाठिंबा मिळत आहे. शनिवारी रक्तरंजित अंगठे करून तो कागद सरकारला पाठवण्यात येणार असल्याचे सतीश दत्तू यांनी सांगितले, आज तब्बल ११७ बांधवांनी रक्तदान करून अनोख्या आंदोलन करत मराठा आंदोलनाचा प्रश्न लवकर मार्गी लावण्याचा दृष्टीने सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी डॉ सुनील जाधव डॉ संदेश पडवळ, डॉ अभिजीत हजारे, डॉ.दशरथ फरकंडे,डॉ नितीन आसबे, डॉ. नितीन क्षीरसागर, डॉ.विवेक निकम,डॉ.अतुल निकम, डॉ देवदत्त पवार,डॉ युवराज पवार, डॉ.रविंद्र गायकवाड ,डॉ प्रशांत नकाते, डॉ.सुभाष देशमुख , डॉ. अतुल भालके,डॉ.सदानंद माने, डॉ.पंडीत गोरे,राहुल सावजी संभाजी घुले, सतीश दत्तू, ज्ञानेश्वर कोंडूभैरी, शिवाजी वाकडे,आनंद मुडे, प्रकाश मुळीक, सुखदेव डोरले,प्रा.येताळा भगत, युवराज घुले,मारुती वाकडे,ॲड राहुल घुले,अनिल मुद्गुल, विजय हजारे, भगवान चव्हाण, आदी उपस्थित होते.

## शिवाजी चौक गणेश मंडळाची धुरा यंदा महिलांच्या हातात

### अध्यक्षपदी प्रिया मेहता यांची निवड

**सुराज्य/कुर्डूवाडी**

येथील शिवसेना प्रणित छत्रपती शिवाजी महाराज चौक गणेश मंडळाने अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त यावर्षी मंडळाची धुरा महिलांच्या हाती सोपवली असून महिलांसह पुरूषांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याचे मंडळाचे आधारस्तंभ शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांनी सांगितले.



सभासदांच्या बैठकीत यावर्षीसाठी अध्यक्षा म्हणून प्रिया मेहता, उपाध्यक्षपदी स्नेहा गवळी तर खजिनदार म्हणुन सिंधू गवारे यांची निवड करण्यात आली. तसेच सजावट प्रमुख म्हणुन दीपा डिकोळे, करूणा परबत, स्वाती लचके, सोनाली गवळी, वैष्णवी परबत, क्षितीजा बागल, वैशाली तरटे, जुईली कांबळे, संजीवनी दसंगे, साक्षी डिकोळे, वैष्णवी कदम व साक्षी गवारे,नियोजन समिती मध्ये अनुराधा डिकोळे, पंकजा ताकभाते, रेखा कदम, शैला गवळी, नयना भांबुरे, विद्या शेंडे, प्रिया शहा, रूपाली कोले, वृषाली गांधी, तृप्ती शेटे, वनिता कदम, मीरा गव्हाणे, राणी घाडगे, स्वप्ना शहा व दीपाली तरटे तर मिरवणूक प्रमुख म्हणुन वर्षा डिकोळे, वर्षा कोले,रूपाली शेंडे, रूपाली डिकोळे, धनश्री सुतार, स्वाती घाडगे, पूनम गवळी, अनिता धोका, सुरेखा घाडगे, दिव्या लचके, गौरी शेंडे व प्राची शेंडे यांचा समावेश करण्यात आला आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महिलांसाठी होम मिनिस्टर, मेहंदी, पाककला, मंगळागौरी नृत्य व टाळ पथक हे तर ढोल पथक व विविध स्पर्धा पुरूषांसाठी घेण्यात येणार असल्याचे अध्यक्षा प्रिया मेहता यांनी सांगितले.

## खंडाळी दत्तनगरच्या महिलांनी केली कोल्हापूरची वारी

**सुराज्य/वेळापूर**

श्रावण मासानिमित्त दत्तनगरच्या ४५ महिलांनी कोल्हापूरची धार्मिक वारी केली या वारीमध्ये महिलांनी कन्हेरी मठ, पंचगंगा घाट, रंकाळा तलाव ,ज्योतिबा मंदिर तसेच कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन घेतले.

या धार्मिक दर्शनाचे आयोजन माननीय आमदार रामभाऊ सातपुते यांचे समर्थक व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा माळशिरस तालुक्याचे सरचिटणीस विनोद थिटे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. सर्व महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस मधून महाराष्ट्र शासनाने महिलांना दिलेल्या सन्मान योजनेच्या माध्यमातून हा प्रवास घडला. या कोल्हापूर दर्शन नियोजनासाठी राज्य परिवहन मार्ग महामंडळाच्या सर्व अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले या दर्शनी यात्रेत सर्व महिलांना



संध्याकाळचे जेवण आमदार रामभाऊ सातपुते मित्रपरिवार दत्तनगर यांच्यातर्फे देण्यात आले आत्तापर्यंत या योजनेच्या माध्यमातून दत्तनगर मधील १२५ महिलांनी गाणगापूर व कोल्हापूर दर्शनाचा लाभ घेतलेला आहे.या यात्रा उत्कृष्टपणे आयोजित केल्याने सर्व महिलांनी आमदार रामभाऊ सातपुते व भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस विनोद थिटे यांचे आभार मानले. या यात्रेमध्ये साधना थिटे, निलावती इंगळे,उज्वला पवार सुरेखा काळे, सुलभा पवार ,बाळाबाई खंडागळे, बबीता पवार , केशर भिसे,सुरेखा काळे, पद्मिनी पवार, माधुरी वाघमारे, पद्मिनी कांबळे प्रणिती थिटे, स्वरा गोसावी, गौरी धनवडे, राधा वाघमारे आदींनी सहभाग नोंदवला.

# पाऊस व आणेवरीच्या चुकीच्या नोंदीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान : खा. निंबाळकर

**सुराज्य/कुर्डूवाडी**

सोलापूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण खूप कमी आहे. या दरम्यान पाऊस पडल्यास आमदार व संबंधित अधिकाऱ्यांना कळविल्याशिवाय पाऊस कळवू नका. याचबरोबर दुष्काळाचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी दिल्या

कुर्डूवाडी येथील पंचायत समितीच्या सभागृहामध्ये माढा व करमाळा तालुक्यातील अधिकाऱ्यांची टंचाई निवारण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी ते बोलत होते. यावेळी आ.संजयमामा शिंदे, जि.प.सदस्य रणजितसिंह शिंदे,प्रांताधिकारी प्रियंका अंबेकर, तहसीलदार करमाळा विजयकुमार जाधव, सुनील खमीतकर जिल्हा समाजकल्याण अधिकारी ,महेश सुळे गटविकास अधिकारी माढा,मनोज राऊत गटविकास अधिकारी करमाळा विजयसिंह परबत, उमेश पाटील आदी उपस्थित होते.

खा. निंबाळकर पुढे म्हणाले की दुष्काळ व अवकाळी पाऊस झाल्या नंतर प्रत्येक शेतकऱ्यांना पिकाचे नुकसान भरपाई मिळावी यासाठी अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी लक्षपूर्वक काम करावे. दुष्काळा संबंधित कामाच्या गतीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन कामाचा आढावा बैठक घ्यावी. केंद्र सरकार व राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभा आहे. उजनी धरणातून पाणी सोडण्यात येणार आहे यामुळे धरणाची पातळी कमी होणार आहे. यासाठी पिण्याचे, जनवाराच्या पाण्याचे नियोजन योग्य करून ठेवावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार विनोद रणवरे यांनी केले तर आभार ग्रामसेवक टी. आर. पाटील यांनी मानले.



### कव्हे व होळे पाणीपुरवठ्यासाठी आराखडा तयार करा : आ. शिंदे

माढा तालुक्यातील कव्हे व होळे प्रादेशिक पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी टंचाई आराखडा तयार करावा. पाणीपुरवठा योजनेतून टँकर भरण्याची सोय झाल्यास नजीकच्या टंचाई ग्रस्त गावांना पिण्याचे टँकर भरण्याची सोय होईल. याचबरोबर माढा व मोडनिंब गावातील पाण्याचा आराखडा तयार करून ठेवण्याच्या सूचना आमदार बबनराव शिंदे यांनी दिला.

## पर्युषण महापर्व हा जैनांचा सर्वात मोठा आध्यात्मिक सण : प्रा पगारिया

**सुराज्य/बार्शी**

पर्युषण महापर्व हा जैनांचा सर्वात मोठा आध्यात्मिक महोत्सव आहे. या काळामध्ये जैन श्रावक- श्राविका तप, जप, साधना आणि संतवाणी श्रवण या माध्यमातून अध्यात्मिक ऊर्जा प्राप्त करून आत्मकल्याणासाठी प्रयत्नशील असतात असे डॉ अशोककुमार पगारिया म्हणाले. ते पर्युषण सप्ताहाच्या प्रारंभप्रसंगी बोलत होते.

येथील जैन स्थानकामध्ये जैन समाजाचा सर्वात मोठा आध्यात्मिक सण पर्युषण महापर्व यानिमित्त पुणे येथील डॉ अशोककुमार पगारिया, ड पी एम जैन , शांतीलालजी फुलफगर आठ दिवसासाठी स्वाध्याय सेवा देण्यासाठी आलेले आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन बार्शी संघाचे अध्यक्ष जयचंद सुराणा, उपाध्यक्ष चंद्रकांत कोठारी, अजित कुंकुलोळ, पारस कांकरिया, दिनेश श्रीश्रीमाळ, भारत कोटेचा, बाळासाहेब श्रीश्रीमाळ, महिला मंडळ, युवक मंडळ करीत आहेत.

# आ. बबनदादा शिंदे यांचे काम उल्लेखनीय : खा. निंबाळकर

## जांभूड येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

सुराज्य/श्रीपूर

**माढा मतदार संघाचे विधानसभा सदस्य आ.बबनदादा शिंदे यांचे माढा मतदार संघातील माळशिरस तालुक्यामधील गावावरती विशेष प्रेम असून आ.बबनदादा हे माळशिरस तालुक्यामधील पूर्व भागाच्या टोकाच्या गावात टोकाची ताकद लावून काम करत आहेत ही सर्वात महत्वाची व उल्लेखनीय बाब आहे. असे प्रतिपादन माढा लोकसभा मतदार संघाचे खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी व्यक्त केले.**



माढा विधानसभा मतदार संघातील माळशिरस तालुक्यातील विविध विकासकामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळाप्रसंगी जांबुड (ता.माळशिरस) येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ.बबनदादा शिंदे, भाजपा प्रदेश कार्यकारी सदस्य राजकुमार पाटील, बंडू नाना ढवळे, नारायण पाटील, जांबुडच्या सरपंच स्वाती खटके, सोसायटीचे चेअरमन राहुल खटके, नगरसेवक निनाद पर्वधन , खळवे गावचे सरपंच अशोक कदम, लवंगचे राहूल टिक ,भाऊसाहेब भांगे ,मौलाचाचा पठाण, महाळुंग सोसायटी चेअरमन बंडू वाळेकर ,विक्रम लाटे, दादा लाटे, गजानन माने-देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

खा. नाईक-निंबाळकर, आ.बबनदादा शिंदे यांच्या शुभहस्ते व भाजपा प्रदेश कार्यकारी सदस्य राजकुमार पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत खळवे ते जांबुड नेवरे रस्ता, प्रजिमा-१८८ मध्ये सुधारणा करणे व जांबुड गावाजवळ पुल बांधणे. तसेच ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार व्दारे अर्थसहाय्य प्रकल्प वेळापूर पासून महाळुंग पर्यंत या कामांचा लोकार्पण सोहळा. त्याचबरोबर माळशिरस तालुक्यातील प्रमुख राज्यमार्ग-१५ पासून दसुर-खळवे-जांबुड-नेवरे रस्ता, प्रजिमा-१८८ किमी २/००० ते ८/००० मध्ये सुधारणा करणे आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजना बोरगांव ते १४ सेक्शन पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व देखभाल करणे. एकूण लांबी ३.०० किमी. या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

पुढे बोलताना खा.नाईक-निंबाळकर म्हणाले, आ.बबनदादां यांनी या भागातील गावात मोठ्या प्रमाणात कामे मंजूर केली आहेत हे विशेष आहे. तसेच जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शदे यांचेही या भागावर अतिरिक्त विशेष लक्ष आहे. भागातील सगळी माणसे लढणारी माणसे आहेत, रडणारी नाहीत आणि अशा माणसांना भेटल्यावर मलाच उर्जा येत व तुमची लढण्याची उर्जा पाहून मी पुढे लढू शकतो असेही खा.नाईक-निंबाळकर म्हणाले.

यावेळी, सचिन चंदनशिवे, दादा माने, सुमित भोसले, मयूर शेख, अनिल पाटील, उंबरे गावाचे उपसरपंच सुनिल राजमाने , उत्तम भोसले, सागर भोसले, रवी भोसले, अनिकेत बाबर, किशोर कांबळे, भिमराव खटके, आनंद घोडके, सुरज शिंदे, हरी भिंगारे, माळखांबी सोसायटी चेअरमन मनोज शेळके, पाणीपुरवठा विभाग माळशिरसचे उपअभियंता बाबर, बांधकाम विभागाचे उपअभियंता कारंडे आदी मान्यवर व जांबूड ग्रामस्थ उपस्थित होते.

### मतदारांच्या मागण्या निश्चित पूर्ण करूः आ. बबनदादा

यावेळी बोलताना आ.बबनदादा शिंदे म्हणाले की, ज्यावेळी मी पहिल्यांदा आलो होतो त्यावेळेस जवळ कोणीच येत नव्हते पण आता भरपूर लोक येत आहेत. ज्या-ज्या आपल्या मागण्या आहेत त्या भविष्य काळात पूर्ण केल्या जातील. या भागातील गावकरी, सरपंच सगळेच चांगलेच काम करत आहेत कामे चांगली करा जेणेकरून पिढ्यांन-पिढ्या लोकांनी आपले नाव घेतले पाहिजे. खासदार नाईक-निंबाळकर आपल्या पाठीशी आहेत. कोणीही चिंता करण्याचे कारण नाही.



## जे. बी. सोशल ग्रुपतर्फे नेत्र, मोतीबिंदू तपासणी शिबिर

**सोलापूर** : शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष तथा जे. बी. सोशल ग्रुपचे संस्थापक वाहिद बिजापुरे यांच्या वाढदिवसानिमित्त शास्त्रीनगर परिसरात मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून थायलंड येथील ॅक्टर डीआलो, डॉक्टर निखिल, डॉक्टर आयुषी, व तसेच सीनियर डॉक्टर तोष्णीवाल यांनी सहभाग नोंदवला होता. यावेळी शास्त्री नगर परिसरातील ज्येष्ठ व वयोवृद्ध नागरिकांचे नेत्र तपासण्यात करण्यात आली. यावेळी पीर अहमद कुरेशी, जावेद बीजपुरे, युसुफ माडेकर, जैनू शेख, इलियास डंके, शब्बीर फुलमामडी, राजू इगे, श्रीनिवास गुंडेटी, रफिक चकोले, नागेश यानाम, सैफन मकानदार, फिरोज कलबुर्गी, खालील कलबुर्गी, हुसेन कलबुर्गी, महबूब कोथिंबीर,गफूर वस्तादजी, शाहरुख नदाफ, गौस माडेकर, मोहम्मद शेख, अशपाक जरतार, सादिक बागवान यांसह शास्त्रीनगर परिसरातील नागरिक यांची उपस्थिती होती

## पडसाळीत विविध उपक्रम आणि विकासकामांचे उद्घाटन

**माढा** : रविवार दिनांक१७ सप्टेंबर रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व पडसाळी गावचे सरपंच योगेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहितो ग्रामपंचायत सदस्य अण्णासाहेब मुटकुळे यांनी दिली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब व पडसाळी गावचे विद्यमान सरपंच योगेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सालाबादप्रमाणे भव्य रक्तदान शिबीराचं आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ०९ वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन होणार आहे.. तसेच ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपन करण्यात येणार आहे. यावेळी विविध विकास कामांचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य आण्णासाहेब मुटकुळे यांनी यावेळी दिली. पडसाळी गावातील तसेच पंचक्रोषीतील मित्र परिवारानी सकाळी ०९ ते दुपारी ०२ यावेळेत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन कै. सुरेश (बापू) प्रतिष्ठान पडसाळी यांचे वतीने करण्यात आले आहे.

## मांडवे येथे जावयास कुऱ्हाड काठीने मारहाण

**सोलापूर** : दुचाकीवरून जात असताना तू आमच्या गावातील देवाला का आला. या कारणावरून जावयाला काठी,कुऱ्हाड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना मांडवे (ता.माळशिरस) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात नातेपुतेच्या पोलिसांनी जखमीची पत्नी, सासू आणि मेव्हण्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . संजय शिवाजी लवटे (वय २९ रा. मेडद ता.माळशिरस) असे जखमीचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून त्याची सासू अंजना अप्पाजी पालवे, मेव्हणा अंकुश पालवे आणि पत्नी मनीषा शिवाजी लवटे (सर्व रा.मांडवे) या तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला संजय लवटे हा काल दुपारी ३ वाजेच्या सुमारास आपला मुलगा श्रेयस व शेजारी राहणारी शितल पालवे याच्यासोबत दुचाकीवरून मांडवे येथील म्हसोबा मंदिर येथे दर्शनासाठी जात होता. त्यावेळी त्याला वाटेत अडवून, तू आमच्या गावातील देवाला का आला? असे म्हणून त्याला खाली पाडून काठी आणि लाथाबुक्याने मारहाण केली तर त्याची पत्नी मनीषा लवटे हिने कुऱ्हाडीने पायावर मारहाण केली. असे त्याच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार माने करीत आहेत.

## सहा वर्षांपासून खून करून फरार असलेला खुन्यास अटक

**पंढरपूर** : पत्नीचा खून करून व सासूवर जीव घेणा हल्ला करून तब्बल सहा वर्षापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या तालुक्यातील गार्डी येथील आरोपीस पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी भाऊसाहेब भानुदास अडगळे यास अटक करण्यात आली आहे. चारित्र्याच्या संशयावरून भाऊसाहेब याने १३ जुलै २०१६ रोजी आपली पत्नी भागुबाई हिच्यावर कोयत्याने हल्ला करून ठार केले होते तर तिला सोडविण्यासाठी आलेल्या सासूवर देखील कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. घटना घडल्यापासून फरार असलेल्या भाऊसाहेबाला अटक करण्यासाठी पोलीस अनेक दिवसापासून प्रयत्न करीत होते. परंतु याला यश आले नाही. अखेर १६ सप्टेंबर रोजी हा आरोपी गार्डी येथे आला असल्याची गोपनीय माहिती तालुका पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अचानक छापा मारून भाऊसाहेब अडगळे यास अटक केली.

# भाजपा सोलापूर ग्रामीण पूर्वची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

सुराज्य/सोलापूर

**▶▶ सरचिटणीसपदी मनीष देशमुख, शशिकांत चव्हाणांसह चौघांची वर्णी**
**▶▶ १० उपाध्यक्ष, १० चिटणीसांसह १२० जणांची जंबो कार्यकारिणी**

भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण पूर्व जिल्ह्याची नूतन कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आज जाहीर केली. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने शनिवारी त्याची घोषणा जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांनी केली.

यामध्ये जिल्हा सरचिटणीसपदी शशिकांत चव्हाण, मनीष देशमुख, विकास वायमारे व सुरेखा होळीकट्टी या ४ जणांची निवड करण्यात आली. तर १० उपाध्यक्ष, १० चिटणीस, १ कोषाध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य आणि विशेष निमंत्रित सदस्य अशा तब्बल १२० जणांच्या जंबो कार्यकारिणीची घोषणा सोलापूर येथे करण्यात आली. आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुका व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या घोषणा महत्वपूर्ण मानल्या जात आहेत. अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर व मंगळवेढा या तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचा या कार्यकारिणीत समावेश आहे.

भारतीय जनता पार्टीचा अंत्योदय कल्याणाचा विचार जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणककारी योजना तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी ही कार्यकारिणी गतीने काम करेल, तसेच जिल्हाध्यक्ष या नात्याने सर्व घटकांना आणि जिल्ह्यातील सर्वांना संधी देत अत्यंत सक्षम कार्यकारिणीची घोषणा केली आहे. येणाऱ्या काळात भाजपा पूर्ण ताकदीने लोकांपर्यंत पोहचेल, शतप्रतिशत भाजपा पक्षवाढीसाठी नव्या कार्यकारिणीसह जोमाने कामाला लागणार असल्याचे मत भाजपा पूर्व सोलापूर जिल्हाध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी बोलताना सांगितले.





### हे आहेत विशेष निमंत्रित सदस्य

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, खासदार धनंजय महाडिक, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, शंकरराव वाघमारे.

### नूतन कार्यकारिणी खालीलप्रमाणे

जिल्हा उपाध्यक्ष - आप्पासाहेब बिराजदार, अपर्णा तारके, महादेव पाटील, सतीश काळे, काशिनाथ कदम, संतोष मोगले, गौरीशंकर बुरकुल, सुभाष मस्के जिल्हा चिटणीस - परमेश्वर यादवाड, बादलसिंह ठाकूर, यतिन शहा, सिद्धेश्वर कोकरे, बसवराज शेळके, सतीश पाटील, सिद्धाराम हेले, नितीन करंडे, स्वाती रोकडे, प्रकाश घोडके तर कोषाध्यक्षपदी इंद्रजित पवार यांची निवड करण्यात आली. तसेच भाजपा युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी सुदर्शन यादव, महिला मोर्चाच्या अध्यक्ष पदी प्राजक्ता बेणारे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्षपदी चांगदेव कांबळे, अल्पसंख्यांक मोर्च्याच्या अध्यक्षपदी फैज अहमद कोरबू, किसान मोर्च्याच्या अध्यक्ष पदी जगन्नाथ गायकवाड, आदिवासी मोर्चाच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर भोसले व भटके विमुक्त आघाडीच्या संयोजकपदी शशिकांत गावडे यांची नियुक्ती करण्यात आली.

# रुग्णसेवेत मानवतेच्या दृष्टीकोनातून पटेल यांचे मोलाचे योगदान : शिंदे

सुराज्य/सोलापूर



अश्विनी सहकारी रुग्णालयाचे चेअरमन तथा अश्विनी ग्रामीण महाविद्यालय व रुग्णालय कुंभारीचे कार्यकारी विश्वस्त बिपीनभाई पटेल यांचे सामाजिक कार्य गौरवास्पद आहे. रुग्णसेवेमध्ये मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांनी दिलेले योगदान खूप मोलाचे आहे, असे गौरवोद्गार माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी येथे काढले.

सोलापुरातील अशोक लांबतुरे प्रतिष्ठानतर्फे शनिवारी श्री बिपीनभाई पटेल यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जुळे सोलापुरातील जगदीशश्री मंगलकार्यालयात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर बिपीनभाई पटेल यांच्या पत्नी भारतीबेन पटेल, आमदार संजय शिंदे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक लांबतुरे, सुरेखाताई लांबतुरे, अश्विनी रुग्णालयाचे संचालक जयेशभाई पटेल, अश्विनी महाविद्यालयाचे विश्वस्त मेहूलभाई पटेल, हरिषभाई पटेल, अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, डॉ. सचिन मुंबरे, चेतन नरोटे, सुरेश हसापुरे, शिवलिंग कांबळे, अनिल कादे, बाळकृष्ण सोनवणे, वसंत सपताळे, मधुकर गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक लांबतुरे यांनी बिपीनभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

यानंतर बिपीनभाई पटेल आणि त्यांच्या पत्नी भारतीबेन पटेल यांचा सत्कार सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. पटेल यांची ग्रंथतुला आणि धान्यतुला करण्यात आली. त्यानंतर शिंदे व पटेल यांच्याहस्ते ७५ ज्येष्ठ नागरिकांना सन्मानचित्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन दत्तात्रय मोकाशी यांनी केले. आभार रवी कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी अंबण्णा काळे, विजयेंद्र शिखरे, अविनाश चाबुकस्वार, हणमंतू टोणपे, संगीता जाधव, अलका गवळी, जगदेवी रगटे, सिता दीक्षित, शितल शेरखाने, जयश्री सपताळे, सावित्री शिंदे, रंजना शिंदे, रवी कांबळे, बाळासाहेब राऊत, रवी व्हनकोळी, प्रवीण इरकशेट्टी, संतोष कबाडे, दत्तात्रय मस्तूद, प्रमोद घोडके, माणिक टोणपे, बाळू सुरवसे, कृष्णा काळे, विवेक कांबळे, सारीका शेखखाने, किरण ननवरे, मनीषा कबाडे, सुलभा शिंदे, छायप्पा चव्हाण, तुकाराम चाबुकस्वार, अशोक कांबळे, किरण व्हनकोरे, भिमसेन शिंदे, अरुण शिंदे, दिगंबर रकटे, कलप्पा व्हनकई, शिवानंद व्हनकोरे, परमेश्वर चाबुकस्वार, मल्लिकार्जुन मग्रुमखाने, संजय सुरवसे, सुरेश काळे, किरण ननवरे, सोमनाथ कांबळे, विनोद जाधव, प्रदीप घागरे, अजय कांबळे, दत्तात्रय राजगुरु, सागर घोडके, भगत विनय आदींची उपस्थिती होती.

### सोलापूरकांची भक्कम साथ

उद्योग, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात काम करताना सोलापूरकरांची नेहमीच भक्कम साथ लाभली. ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचाही सहकार्याचा हात कायम पाठिशी होता. म्हणूनच ही यशस्वी वाटचाल अधिक सुकर झाली. यापुढेही असेच आशीर्वाद, सदिच्छा कायम सोबत राहू द्या, अशा भावना यानिमित्ताने बिपीनभाई पटेल यांनी व्यक्त केल्या.

## माढा व महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीच्या विकासासाठी निधी द्यावा : आ. रणजितसिंह



**सोलापूर** : माढा विधानसभा मतदारसंघातील माढा व महाळुंग श्रीपुर नगरपंचायती अंतर्गत विकासकामांसाठी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ५ कोटी रूपयांची मागणी केली आहे.

माढा विधानसभा मतदार संघातील माढा व महाळुंग श्रीपुर नगरपंचायती अंतर्गत डांबरी व काँक्रिट रस्ते, गटारी, सभामंडप इत्यादी कामांच्या माध्यमातून परिसराचा विकास व्हावा या उद्देशाने आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी माढा विधानसभा मतदार संघातील महाळुंग श्रीपुर नगरपंचायतीच्या विविध प्रभागातील २६ कामांसाठी व माढा नगरपंचायतीसाठी ६ कामांसाठी एकूण ५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करून प्रस्तावित कामे मार्गी लावण्याचे सुचना दिल्या आहेत. तसेच अल्पसंख्याक विकास योजनेअंतर्गत मोडनिंब (२), बेंबळे, सुरली या गावातील विविध कामांसाठी २५ लाखांच्या निधीची मागणीही करण्यात आली आहे.

## पत्नी गेली माहेरी आणि पतीने सवत आणली घरी


**मंगळवेढा** : लग्नामध्ये मानपान केले नसून, जागा घेण्यासाठी विवाहितेकडे पैशाची मागणी केली. या त्रासाला कंटाळून विवाहित माहेरी आल्यानंतर, पतीने दुसरे लग्न केल्याची तक्रार पत्नीने मंगळवेढा पोलिस ठाण्यात दिली आहे. याबाबत प्रियंका पडोळे (रा. साळमाळगेवाडी, ता. ) यांनी फिर्याद दिली आहे. यानुसार, प्रदीप पडोळे, अर्चना पडोळे, बाळासाहेब पडोळे, प्रतीक्षा पडोळे (चौघे रा. साळमाळगेवाडी, ता. मंगळवेढा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादीनुसार, प्रियंका आणि प्रदीप यांचे लग्न १७ डिसेंबर २०२० मध्ये झाले होते. लग्नानंतर सासरकडील लोकांनी तिला मारहाण केली.

# विवेकानंद' प्रतिष्ठानतर्फे २२ सप्टेंबरपासून गणेशोत्सव व्याख्यानमाला

सुराज्य/अक्कलकोट

**येथील विवेकानंद प्रतिष्ठानच्यावतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन २२ ते २७ सप्टेंबर रोजी सायं.६ वा. प्रियदर्शिनी सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. यंदाही महाराष्ट्र व कर्नाटकातील दिग्गज नामवंत व्याख्याते व्याख्यानमालेत हजेरी लावणार आहेत.**








शुक्रवार, २२ सप्टेंबर रोजी पहिले पुष्प बेंगळुर येथील प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. विजयालक्ष्मी बाळेकुंद्री ह्या आहार आणि आरोग्य विषयावर कन्नडमध्ये व्याख्यान देणार आहेत. शनिवार, २३ सप्टेंबर रोजी पुणे येथील दुर्गअभ्यासक, शिव व्याख्याते राहुल नलावडे हे शिवरायांचे शिवभारत' या विषयावर एलईडी प्रेझेंटेशनव्दारे व्याख्यान, रविवार २४ सप्टेंबर रोजी विज्ञान पत्रकार मयुरेश प्रभुणे (पुणे) हे इस्त्रोच्या मोहिमांचे प्रत्यक्षदर्शी अनुभव कथन एलईडी प्रेझेंटेशनव्दार अंतराळावरची भारत मुद्रा' करणार आहेत. सोमवार, २५ सप्टेंबर रोजी ✻गायिका व सिने नायिका, फिल्मफेअर अवॉर्ड विजेती केतकी माटेगांवकर यांचे रंग माझा वेगळा' सुरांनी बहरलेला मराठी,✻ हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करणार आहेत. मंगळवार, दि.२६ सप्टेंबर रोजी १८०० प्रयोगांचा टप्पा पार केलेला ✻सलील कुलकर्णी व संदीप खरे (मुंबई) यांचे आयुष्यावर बोलू काही ' यांचा प्रयोग होणार आहे. बुधवार, दि.२७ सप्टेंबर रोजी ✻हास्यसम्राट अजितकुमार कोष्टी चला हसुया' कार्यक्रम होणार आहेत.

तसेच दि.२३ ते २७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते सायं.६.३० वाजेपर्यंत प्रियदर्शिनी मंगल कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर विविध प्रकाशकांची नामांकित पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीसाठी होणार आहे. अक्कलकोट शहर ग्रामीण भागातील रसिक श्रोत्यांनी बौध्दिक व्याख्यानमाला व पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहेत.

या पत्रकार परिषदेस प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर, मल्लिकार्जुन मसुती, अशोक येणगुरे, विलास कोरे, मिलन कल्याणशेट्टी, मल्लिकार्जुन आळगी, महेश कापसे, गुरुपादप्पा आळगी, मनोज कल्याणशेट्टी, विक्रम शिंदे, नितीन पाटील, अमोल कोकाटे, चंद्रकांत दसले आदीजण उपस्थित होते.


सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
चेअरमन
श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि वेणूनगर गुरसाळे
अभिजीत (आबा) पाटील
धाराशिव साखर कारखाना लि. उस्मानाबाद
धाराशिव कारखाना लि. नाशिक
धाराशिव कारखाना लि. नांदेड
धाराशिव कारखाना लि. सांगोला
धाराशिव साखर कारखाना लि. बीड
डी.व्ही.पी.नागरी सहकारी पतसंस्था उस्मानाबाद
दि. पीपल मल्टीस्टेट को - ऑप क्रेडिट सोसा. लि.
समृध्दी ट्रॅक्टर्स, पंढरपुर
हॉटेल विठ्ठल पंढरपूर
डी.व्ही.पी. स्क्वेअर पंढरपुर
सोलापूर जिल्हा ट्रॅक्टर डिलर असोसिएशन

# निस्वार्थी संघर्षयात्री कुमारदादा करजगी



**कर्तृत्व आणि कर्म चांगले असणार माणूसच समाजाचा आदर्श बनत असतो. गोरगरिबांसाठी, उद्ध्वस्त झालेल्या कामगार कुटुंबियांसाठी लढा उभारून त्या लढ्याला अभूतपूर्व यश मिळवित जुनी मिलच्या कामगार वारसदारांना न्याय मिळवून देणारे एक झुंजार आणि संघर्षशील नेर्तृत्व उदयास आले. ते म्हणजे कुमारदादा करजगी. १९८८ पासून कामगारांच्या न्याय हक्कासाठी वर्षानुवर्ष खंड न पडता लढा उभा करुन कुमारदादा करजगी यांनी पुढेच पाऊल टाकले आहे. सर्वोच्च न्यायालात हेलपाटेवर हेलपाटे मारुन निकाल जिंकणारे कुमारदादा करजगी हे सोलापुरातील एकमेव व्यक्तिमत्व ठरले आहेत की त्यांनी आजवर शेकडोवेळा न्यायालयाचे दारे झिजवले आहेत. सोलापूरच्या विकासाची तळमळ घेऊन सोलापूर जनशक्ती विकास मंचची स्थापन केली. सर्वदूर कार्य असलेले कुमारदादा करजगी यांच्या कार्याची दखल बीबीसीनेही घेतली असून केंब्रीज विद्यापीठाने त्यांच्या कार्याचा आदर करून 'डॉक्टरेट' ही पदवी बहाल केली आहे. अशा या शिक्षण, पर्यटन, सांस्कृतिक, सामजिक, आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात वयाच्या ७५ व्या वर्षीही तरुणाला लाजवेल अशा पध्दतीने काम करणारे कुमारदादा करजगी या 'संघर्षयात्री' च्या कार्यावर टाकलेला हा प्रकाश.**

सोलापूर शहर हे गिरण-गाव म्हणून ओळखले जाते. संपूर्ण आशियाखंडात उत्पादनात अग्रेसर असणारी सोलापूर जुनी मिल ही १९६३ मध्ये बंद पडली. त्यामुळे हजारो कामगार देशोधडीला लागले. त्यांची मिलकडून येणारी कोट्यवधी रुपयांची रक्कम रक्कम थकीत राहिली. उपजीविकेसाठी अनेकांनी स्थलांतर केले. उपासमार आणि परवड अशा. हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या मिल कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी जवळपास वीस वर्षांनी म्हणजेच १९८३ च्या सुमारास कामगार पुत्र कुमार शंकर करजगी यांनी आंदोलन सुरू केले. कामगारांच्या न्याय हक्कासाठी ३५ वर्षे न्यायालयीन लढाई लढावी लागली.

सलग बारा वर्षे न्याय हक्कांसाठी जुनी मिल कामगार वारसदारांचे दिवसरात्र सुरू असलेले आमरण साखळी उपोषण हे या आंदोलनातील प्रमुख वैशिष्ट्य होते. संपूर्ण देशभरात ३५ वर्षे एवढा सर्वाधिक काळ चाललेला कामगार लढा म्हणून याची बीबीसीने देखील नोंद घेतली. हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी मिल मालकांनी आणि तत्कालिन स्थानिक राजकीय नेत्यांनी अनेंक प्रयत्न केले. मिल व्यवस्थापनाने हे आंदोलन मोडीत काढण्यासाठी कामगार नेते कुमारदादा करजगी

कामगारांच्या वारसदारांना, गोरगरिबांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे. म्हणून ऑर्किड इंग्लिश स्कूल सुरू केले. या शाळेतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जाते. तर हिप्परगा येथील स्वतःची जमीन दान करीत एकुलता एक मुलगा स्व. नागेश करजगी यांच्या स्मरणार्थ नागेश करजगी-ऑर्किड इंजिनिअरिंग कॉलेज सुरू केले. आज विदेशातही या कॉलेजचे विद्यार्थी पोहोचले आहेत.

सतत मिल कामगार कुटुंबियांच्या विकासासाठी झटणाऱ्या कुमारदादा करजगी यांनी आपली उपक्रमशीलता कायम ठेवली आहे. आता शहराच्या रचनात्मक विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून नव्या संघर्षकडे त्यांची वाटचाल सुरू झाली आहे.

## सार्वजनिक ट्रस्ट आणि मदतीचा ओघ

गतवर्षी ९ ऑगस्ट २०९९ रोजी त्यांनी शहर विकासाचे ध्येय्य डोळ्यासमोर ठेवून जनशक्ती विचार मंचची स्थापना केली असून आता आगामी काळात शहराच्या विकासात्मक कार्यासाठी नागरी आघाडी तयार करून नव्या संघर्षाला सुरुवात करण्याचा त्यांचा मनोदय आहे. याच करिता त्यांनी वेगवेगळ्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी एक विश्वस्त संस्था स्थापन करीत उर्वरित मिळकत ट्रस्टच्या नावे दान करण्याचा निर्णय घेतला आहे. जुनी मिलची शहरातील मध्यवर्ती भागांतील कमर्शियल प्रॉपर्टी ही अंदाजे चारशे कोटींच्या घरात आहे.

सद १८६१ मध्ये ब्रिटीश उद्योगपती - दिनशा रोमर आणि भारतीय उद्योगपती नरोत्तम मोरारजी भाटे यांनी सोलापूर

मोठी म्हणून नावाजलेली सोलापूर येथील जुनी मिल बंद पडल्यानंतर जवळपास ९ हजार कामगार देशोधडीला

## उपलब्धता

जुनी मिल कंपाऊंड मधील उमा गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना १९८८ मध्ये

असून या जागेवर लवकरच मोठे अद्ययावत नेत्र रुग्णालय उभारले जाणार आहे. हे रुग्णालय दिवंगत पुत्र नागेश याच्या

करणाऱ्या कुमारदादा करजगी यांनी नुसती देणीच मिळवून दिली नाहीत तर राहायला हक्काची घरेदेखील दिली. संपूर्ण भारतात लक्षवेधी ठरणारा निकाल त्यांनी केवळ

सकारात्मकतेच्या जोरावर आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावरं कामगारांच्या बाजूने लागण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर बंद पडलेल्या लक्ष्मी विष्णू मिलच्या कामगारांच्या देय रकमासाठी लढा देखील त्यांनी यशस्वी केला. त्यांचा एकुलता एक मुलगा नागेश करजगी याचे अपघाती निधन झाल्यानंतर त्याच्या स्मरणार्थ त्यांनी हिप्परगा येथील जमीन शिक्षण संस्थेसाठी दान करीत इंजिनिअरिंग कॉलेज उभारले. ऑर्किड इंजिनिअरिंग कॉलेजमधून आजमितीस चांगले अभियंते तयार होवून ते औद्योगिक क्षेत्रातील नामांकित कंपन्यांमधून कार्यरत झालेले दिसत आहेत. अभियांत्रिकी शिक्षणांत सोलापूरचे नाव अग्रक्रमावर आणण्याचे काम या संस्थेने केले आहे. स्वत:चे अल्प शिक्षण झाले असतानाही पुढची

करीत सोलापुरात वॉटर पार्क, अम्युजमेंट पार्क, रिसॉर्ट आणि निसर्गोपचार केंद्राची उभारणी करीत कुमार करजगी यांनी पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे. सोलापूर जिल्हा हा भक्ती पर्यटनाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. पंढरपूरचा पांडुरंग, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, मंगळवेढ्याचे दामाजी पंत, निरा नरसिंगपूर जवळच असलेले तुळजापूर, गाणगापूर या भक्तीपीठांच्या दर्शनासाठी येणारे भाविक पर्यटकांना आता निसर्गाचा आनंद देणारे वॉटर पार्क देखील उपलब्ध होत आहे. पूर्वी वॉटर पार्क रिसॉर्ट म्हटले



## चौथी शिकलेल्या माणसाला डॉक्टरेट

घरातील प्रतिकूल परिस्थितीमुळे कुमार करजगी यांना इच्छा असूनही स्वत:चे शिक्षण पूर्ण करता आले नाही. जेमतेथे चौथीपर्यंत त्यांना शिक्षणाची धडे मिळाले. त्यांचे कामगार क्षेत्रातील आणि सामाजिक क्षेत्रातील कार्य बहरत गेले. स्वत:चे शिक्षण झाले नसतानाही कामगारांची व सर्वसामान्यांची मुले शिक्षणापासून दूर राहू नयेत म्हणून त्यांनी शिक्षण संस्था उभ्या केल्या. त्या नावारुपास आल्या. त्यांची कामगारांविषयीची तळमळ, गोरगरिब मुलांच्ळा शिक्षणाविषयीची धडपड, सामाजिक क्षेत्रातील कार्य, दानशूरपणा या साऱ्या गोष्टींचा विचार करुन कॅलिफोर्निया युनिर्व्हरसिटी (अमेरिका) ने दखल घेतली. आणि त्यांचा 'डॉक्टेरट' ही पदवी बहाल केली. एका चौथी शिकलेल्या व्यक्तीला 'डॉक्टरेट' पदवीचा मिळालेला हा बहुमान हा भारतातील अद्वितीय आहे.

## जनशक्ती सोलापूर विकास मंचची स्थापना

जनसेवेसाठी जनशक्ती सोलापूर विकासमंच या समाजसेवी संघटनेची उभारणी केली आहे. या संघटनेत समाजातील सर्वच क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ मार्गदर्शकांचा समावेश असणार आहे. सोलापूर शहराच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचा या माध्यमातून प्रयत्न केला जाणार आहे. विकासकामे ही भ्रष्टाचारमुक्त आणि मुदतीत पूर्ण व्हावीत. याबरोबरच जनतेच्या सूचनांचा त्यात अंतर्भाव असावा यासाठी ही संघटना आंदोलनात्मक भूमिकेतून प्रशासनावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. राजकारणाविरहीत समाजकारण. या शुद्ध हेतूने कुमारदादांनी या समाजसेवी संघटनेची स्थापना केली आहे.

यांना त्याकाळी (१९८८) मध्ये दोन कोटींची रक्कम देवू केली होती. मात्र कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी कुमारदादा यांनी ही रक्कम नाकारत लढा अधिक तीव्र केल्याने ते चांगलेच चर्चेत आले होते. रकमा मिळवून देण्यासाठी मिलची जमीन संघर्ष समितीच्या माध्यमातून कुमार करंजगी यांनी न्यायालयाकडून खरेदी केली. त्यातून देय रकमा देवून कामगार आणि कामगारांच्या वारसदारांसाठी उमानगरी हा गृहनिर्माण प्रकल्प देखील साकारला. शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या करोडो रुपये किंमतीच्या मिलच्या जमिनीमुळे कुमार करजगी यांना तथाकथित स्थानिक राजकोय नेते, बिल्डर यांचाही खूप त्रास झाला. यासर्व अडचणींवर मात करीत त्यांनी कामगार लढा यशस्वी केला.

दि. ५ फेब्रुवारी २०२१ रोजी आपल्या जन्मदिनाचे औचित्य साधत कामगार नेते कुमारदादा करजगी यांनी कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून बेरोजगार युवक, गरीब महिला-पुरुष, झोपडपट्टीवासियांचे आरोग्य आणि स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रोत्साहनपर उपक्रम राबविणे, अर्थसहाय्य करणे, शिक्षणासाठी नियोजनबद्ध पालकत्व स्वीकारणे, संसर्गजन्य रोगविरुद्ध लसीकरण, गरिबांच्या मुलांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी आर्थिक मदतीची. तरतूद करणे याबरोबरच क्रीडा,कला वृद्धीसाठी उपक्रम राबविणे ' आदी समाज उन्नतीची कार्ये या. ट्रस्टच्या माध्यमातून केली जाणार आहेत.

## सर्वात मोठी प्रेरणा

जुनी मिल नावाने ओळखली जाणारी मिल सुरू केली. या मिलचा प्रचंड विस्तार झाला. ही मील आशिया खंडातील सर्वात मोठी मिल म्हणून प्रसिद्ध झाली. त्या काळी या मिलमध्ये २२ हजार कामगार काम करत होते. यामुळेच १९३१ साली सोलापूरला मँचेस्टर सिटी म्हणून जगात ओळख मिळाली. १९६१ मध्ये या जुनी मिलला स्थानिक कामगार नेत्यांमुळे गालबोट लागले. १९६२ मध्ये जागतिक मंदीच्या कचाट्यात सापडल्याने मिल मालकांनी कामगार कपात सुरू केली. त्यावेळी कामगार पुढाऱ्यांनी आंदोलन छेडून मिलच्या भव्य प्रवेशद्वारसमोरच मिलचे तत्कालीन मालक गोकुळदास मोरारका यांचा पुतळा जाळला. संतप्त झालेल्या मोरारका यांनी मिल बंद केली. त्यामुळे ९ हजार कामगार देशोधडीला लागले. या मिलमुळे सोलापूरचे अर्थकारणच ढासळले. मिलवर अवलंबून असलेला रोजगारही बुडाला आणि सोलापूर बकाल खेडेगाव बनले. हे कुमारदादा करजगी यांना बघवले नाही. त्यातून न्यायहक्कासाठी त्यांचे नेतृत्व पुढे आले.

## असा झाला टर्निंग्पॉईट

आशिया खंडातील सर्वात

## उपक्रमशील कुमारदादा

सतत मिल कामगार कुटुंबियाच्या विकासासाठी झटणाऱ्या कुमारदादा करजगी यांनी आपली उपक्रशीलता कायम ठेवली आहे. आता शहराच्या रचनात्मक विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून नव्या संघर्षाकडे त्यांची वाटचालू सुरु आहे. यासाठी त्यांनी जनशक्ती विचार मंचची स्थापना केली असून आता आगामी काळात शहराच्या विकासात्मक कार्यासाठी नागरी आघाडी तयार करुन नव्या संघर्षाला सुरुवात करण्याचा त्यांचा मनोदय आहे. याचकरिता त्यांनी वेगवेगळ्या उर्वरित मिळकती ट्रस्टच्या नावे दान करण्याचा निर्णय घेतला आहे. याच भूमिकेतून ज्येष्ठ पत्रकार निवृत्त पोलीस आणि वारसदार यांना जागा देण्याचा निर्णय घेतला आहे.

लागले होते. या कामगारांच्या देय रकमा. मिळवून देण्यासाठी ३५ वर्षानंतर जुनी मिल बेकार कामगार वारसदार आणि जनहित संघर्ष समितीच्या वतीने संस्थापक कुमार करजगी यांनी संघर्ष उभारून न्यायालयीन लढाई जिंकत वारसदारांना लाभ मिळवून दिला. याबरोबरच जुनी मिलच्या अखत्यारितीतील जमीन न्यायालयीन लढाईद्वारे समितीच्या नावावर करून त्या काळात जागेसाठी दावा करणाऱ्या नागरिकांना स्वस्तात जमिनी दिल्या. हा संघर्ष अजून सुरूच आहे. कामगारांच्या न्याय मागण्या व भविष्यनिर्वाह निधी मिळवून दिल्यानंतरही जुनी मिलची विकत घेतलेली जमीन हा कुमार करजगी यांच्या आयुष्यभराच्या संघर्षाचा विषय बनलेला आहे.

दिलेल्या वचनाप्रमाणे अल्प किमतीत म्हणजेच ३० रुपये स्क्वे. फूट दराने जागा देण्यास बाधील असून त्या सभासदांनी रक्कम जमा केल्यास जागा त्यांच्या नावे करण्यात येईल अशी ग्वाही कुमार करजगी यांनी दिली आहे. उमा गृहनिर्माणच्या नावाने एक ते दहा सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून १९९९ मध्येच ताब्यात आलेल्या ६५ एकर २१ गुंठे या जागेचे वाटप केलेले आहे.

## दोन एकर जागेत नेत्र रुग्णालय

सोलापुरातील गरीब कामगारांच्या नेत्र शस्त्रक्रिया मोफत व्हाव्यात यासाठी कुमार करजगी यांनी बार्शी रोडवरील खेड येथील स्वतःची दोन एकर जागा पुण्याच्या एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल यांना दिली

स्मृतींना समर्पित केले असून नागेश यांचीच इच्छा होती म्हणून मोफत औषधोपचार देण्याचा मानस कुमार करजगी यांनी बोलून दाखविला. हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या कुमार करजगी यांचे अक्षर ओळखच्या पलिकडे शिक्षण होवू शकले नाही. उदरनिर्वाहासाठी हरिभाई देवकरण शाळेच्या समोर बर्फ गोळा विकण्याचे काम करणाऱ्या कुमार करजगी यांनी आपली एक शाळा असावी असे स्वप्न पाहिले होते. दिवंकर पुत्र नागेश यांच्या स्मरणार्थ त्यांनी उमा नगरीच्या आवारात नागेश करजगी ऑर्किड स्कूल २०१२ ला सुरू केले असून शैक्षणिक क्षेत्रात या शाळेने गुणवत्तेच्या जोरावर अल्पावधीत नाव कमावले आहे.

## समाजासाठी संदेश

सर्वसामान्यांच्या कामगारांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण स्पर्धा करू. शकतील हाच विचार केंद्रस्थानी धरून नागेश करजगी ऑर्किड स्कूलची उभारणी केली आहे. येथील विद्यार्थी आता उच्च शिक्षणासाठी नामवंत विद्यापीठातून प्रवेश घेत आहेत. या मुलांमध्ये ते आपल्या दिवंगत मुलाची प्रतिमा जपत आहेत. जवळपास बारा वर्षे साखळी उपोषण आणि आंदोलन

## असे आहे वेगळेपण

जुनी मिलमधील कामगार शंकर करजगी यांचे पुत्र असलेले कुमार करजगी यांनी १९८८ मध्ये मील कामगारांच्या वारसदारांना गोळा करत जुनी मील बेकार कामगार संघर्ष समितीची स्थापना करून न्यायालयीन लढा चालू केला. भैय्या चौकात सुलग १२ वर्षे साखळी उपोषण, आंदोलन सुरू होते. एवढ्या मोठ्या कालावधीचे आंदोलन हे देखील महाराष्ट्रातील एकमेव मोठे आंदोलन म्हणावे लागेल. कामगारपुत्र कुमार करजगी यांचे नेतृत्व बहरले. कामगारांच्या वारसदारांनी टाकलेला विश्वास हाच आंदोलनाच्या यशाचा मानकरी ठरला. आणि त्यात न्यायालयात प्रदीर्घ काळ संघर्ष करून न्याय मिळवला.

पिढी शिक्षित व्हावी हा ध्यास घेतलेल्या कुमार करजगी यांनी कामगारांच्या मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून नागेश करजगी ऑर्किड इंग्लिश स्कूलची स्थापना केली. प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर दर्जेदार शिक्षण देणारी संस्था म्हणून या संस्थेचा शासनस्तराबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरही पुरस्कार देवून बहुमान करण्यात आला आहे.

## वॉटर पार्क आणि रिसॉर्ट

कै. नागेश करजगी यांचे सोलापुरात एक वॉटर पार्क असावे हे स्वप्न होते. त्यासाठी कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे १८ एकर जमीन देखील घेतलेली होती. मात्र स्व. नागेश यांच्या अपघाती निधनाने हा प्रकल्प काही काळ रखडला होता कै. नागेश यांचे स्वप्न पूर्ण

की सोलापूरपासून दूर जावे लागत होते. आता या सुविधेमुळे पर्यटकांची गर्दी सोलापूरकडे आकर्षित करण्यास मदत होणार आहे. कंदलगाव (ता. द. सोलापूर) येथे १८ एकर जागेत मोहिनी रिसॉर्ट आणि वॉटर पार्क उभारण्यात आले आहे. याठिकाणी वॉटर पार्क, अम्युजमेंट उभारण्यात आले आहे. हे वॉटर पार्क . लोकांसाठी खुले झाले आहे. विविध मनोरंजनाच्या खेळ साधनाबरोबरच बांबू हाऊस, पंचतारांकित रुम्स उपलब्ध आहेत. विविध कंपन्या, संस्था यांना बैठका, प्रशिक्षण शिबिरे घेण्यासाठी कॉन्फरन्स हॉल उभारण्यात आले आहे. येथे सर्व सुविधायुक्त असून निसर्गाच्या सानिध्यात असल्याने सर्व कुटुंबासह विकेंड साजरा करण्यासाठी देखील हे ठिकाण आकर्षणांचे केंद्र बनणार आहे.




# जनतेचा आमदारः विजयकुमार हत्तुरे

## काम असं करा की नाव झालं पाहिजे किंवा नाव असं करा की ऐकून काम झालं पाहिजे



२५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील उत्तर सोलापूर तालुक्यातील १२ गावे १९९२ साली सोलापूर महानगरपालिकेने हद्दवाढ करून शहरात समाविष्ट करून घेतले. त्यामध्ये संपूर्ण शहरीकरण झालेली ग्रामपंचायत म्हणजेच मजरवाडी गाव होते. या गावातील अत्यंत विदारक असा प्रश्न म्हणजे सोलापूर विमानतळ असणाऱ्या या व्हीआयपी होटगी रस्त्यावर प्रेत जाळण्याचा अमानवी प्रकार गेल्या कित्येक वर्षांपासून सुरु होता. मजरेवाडी येथील हिंदू व लिंगायत स्मशानभूमीसाठी युवक काँग्रेसच्या माध्यमातून आंदोलन करून सोलापूर महापालिकेकडून ३ एकर १ गुंठा जागा मिळवली. त्या ठिकाणी स्मशानभूमी सुधारण्यासाठी दीड कोटींची कामे पूर्ण झाली. या प्रश्नाला वाचा फोडून स्मशानभूमीसाठी निधी मिळवून दिला. कोणतेही मोठे पद नसताना देखील आपल्या स्वबळावर विविध विकासकामे मार्गी लावली. त्यामुळे येथील नागरिकांनीच त्यांना जणू जनतेचा आमदार म्हणून पदवी बहाल केली आहे. त्या ऊर्जेतूनच जे आज आणखी दुप्पट वेगाने कार्यरत झालेले आहेत. अशा परिवहनच्या माजी सभापती विजयकुमार हत्तुरे यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा हा झंजावाती आलेख.

### मंगळवेढ्यातील म.बसवेश्वर स्मारकासाठी पाठपुरावा करणार



**महात्मा बसवेश्वर आर्थिक महामंडळाच्या मंजुरीसाठी जोरदार प्रयत्न केले. लिंगायत समाजातील युवकांना रोजगार मिळावा, त्यांना उद्योगांसाठी कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी आ. विनय कोरे यांच्यामार्फत महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन होण्यासाठी प्रयत्न केले. वेळप्रसंगी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही घेतली. अखेर सरकारने बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळास मंजुरी दिली आहे. आता मंगळवेढ्यातील म.बसवेश्वर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे विजयकुमार हत्तुरे यांचे पुढील ध्येय असणार आहे.**

### दक्षिणसाठी उजनीच्या हक्काच्या पाण्यासाठी लढा देणार

दक्षिण तालुक्याला उजनीच्या पाण्याने नेहमीच हुलकावणी दिली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक गावांना उजनीचे पाणी मिळाल्यास येथील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात चांगली वाढ होऊ शकते. त्यासाठी भविष्यात सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळण्यासाठी उजनीच्या हक्काच्या पाण्यासाठी लढा देण्याचा या जनतेच्या आमदाराचा दृढ निश्चय आहे. टेल टू हेड पर्यंत पाणी मिळावे ही त्यांची भूमिका आहे. दक्षिण सोलापूरला वडापूर बंधारा, सादेपूर बंधारा, औज बंधारा, गोविंदपूर बंधारा यांची उंची वाढवल्या पाहिजे. भीमा व सीना खोऱ्यातील शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, त्याचबरोबरच येथील युवकांना रोजगार मिळाल्यास शेतकरी आणि युवकांचे प्रश्न मिटू शकतात. हे दोन्ही प्रश्न मिटवण्यासाठी संघर्षयोद्धा बनण्याची हत्तुरे यांची तयारी आहे. ही तयारीच त्यांना लोकांमूधन जनतेचा आमदार बिरूदावली मिळवून देत आहे.

### मिळालेले पुरस्कार

- नेहरू युवा जिल्हा पुरस्कार २०११ (नेहरू युवा केंद्र, सरकार भारत)
- द इमिनन्स अवॉर्ड, २०१९ (दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र दै. दिव्य मराठी सोलापूर)
- लोकमत-आयकॉन्स ऑफ सोलापूर २०११-२०१७ (दैनिक लोकमत सोलापूर)
- सकाळ-राजकीय आयकॉन-२०१४ (दैनिक सकाळ, सोलापूर)
- युवा जागरूकता पुरस्कार (ड्रीम फाऊंडेशन, सोलापूर)
- बसवरत्न पुरस्कार महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती सार्वजनिक महामंडळ सोलापूर
- समाजरत्न पुरस्कार- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय संस्था सोलापूर

### राजकीय व शासकीय विभागातील पदे

- **कार्याध्यक्ष- सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी**
- सभापती -परिवहन समिती सोलापूर महानगरपालिका सोलापूर (२०१०)
- पक्षनेते - परिवहन समिती सोलापूर महानगरपालिका सोलापूर (२०११)
- सदस्य - सोलापूर शहर महानगरपालिका परिवहन समिती, सोलापूर (२००९)
- अशासकीय सदस्य - जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, सोलापूर अन्न, नागरी पुरवठा विभाग आणि ग्राहक संरक्षण (महाराष्ट्र शासन)
- अशासकीय सदस्य - सोलापूर जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय मत्स्यव्यवसाय विभाग (महाराष्ट्र शासन)
- अशासकीय सदस्य - शांतता समिती आणि मोहल्ला समिती, सोलापूर आयुक्तालय
- अशासकीय सदस्य - पोलीस मित्र समिती, सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे
- अशासकीय सदस्य - श्वान लसीकरण व नसबंदी समिती, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
- विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

### सामाजिक पदे

● संस्थापक अध्यक्ष - महात्मा बसवेश्वर ब्लड बँक सोलापूर ● सरचिटणीस- अखिल भारतीय लिंगायत समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य ● संस्थापक अध्यक्ष - जय हो कामगार संघटना महाराष्ट्र राज्य ● अध्यक्ष - सोनिया अंध अपंग व हस्तकला बहुउद्देशीय संस्था, सोलापूर ● केंद्रीय सदस्य -जागतिक लिंगायत महासभा ● अध्यक्ष-मातोश्री लिं.सौ. सिद्धव्वाबाई हत्तुरे सांस्कृतिक भवन, हत्तुरेनगर सोलापूर ● अध्यक्ष - शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर बहुउद्देशीय सामाजिक व संशोधन संस्था, सोलापूर ● अध्यक्ष - ऋतुजा कृषी व संशोधन बहुउद्देशीय संस्था, सोलापूर ● संस्थापक अध्यक्ष - मध्यवर्ती सद्भावना गणेशोत्सव मंडळ, हत्तुरेनगर सोलापूर ● सल्लागार - अशोक कामटे विचारमंच



### दक्षिणमधून काँग्रेसकडून प्रबळ दावेदारी

**विधानसभेसाठी दक्षिणमधून काँग्रेसकडून लिंगायत समाजातील एक आश्वासक आणि युवा नेता म्हणून हत्तुरे यांची दावेदारी प्रबळ मानली जात आहे. हायकमांडकडून त्यांना तयारीला लागण्याचे आदेश आले आहेत. चिमणीवरून भाजपवर मतदार खास करून लिंगायत समाज नाराज आहे. त्यामुळे लिंगायत समाजातील एक युवा आणि अभ्यासू आणि जनतेत मिसळणार नेता म्हणून हत्तुरे यांचे पारडे जड मानले जात आहे. हा मतदारसंघ शहर आणि ग्रामीणमध्ये विभागला आहे. दोन्ही भागात हत्तुरे यांचा चांगला जनसंपर्क आहे. शिवाय रासपमध्ये प्रदेश उपाध्यक्षपदावर काम केल्याने धनगर समाज बांधवांबरोबर त्यांचे चांगले संबंध आहेत. त्याचा फायदा हत्तुरे यांना होण्याची शक्यता आहे.**












### सर्व नेत्यांबरोबर सलोख्याचे संबंध

जनतेचे प्रश्न सोडवण्याच्या माध्यमातून त्यांचा अनेक मोठमोठ्या नेत्यांशी संपर्क आला. कोणतेही स्वहित लक्षात न घेता जनतेच्या प्रश्नासाठी एखादा व्यक्तीचा इतका चिवट पाठपुरावा पाहून या वरिष्ठ नेत्यांनी देखील या जनसेवकाला आपलेसे करण्याचे काम केले आहे. त्यामुळेच आज माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे असोत किंवा त्यांची कन्या आ. प्रणिती शिंदे असोत यांचे त्यांना पाठबळ आहेच. शिवाय बसव समितीचे अध्यक्ष अरविंद जत्ती, राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, महाराष्ट्र काँग्रेस पक्षाचे निरीक्षक एच.के. पाटील, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री महादेव जानकर, माजी मंत्री यशोमती ठाकूर, वर्षा गायकवाड, आमदार भाई जगताप,आमदार रोहित पवार, आ.सत्यजित तांबे, माजी मंत्री नसीम खान अशा राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांपर्यंत त्यांची ओळख पोहोचली आहे. त्याचबरोबर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी त्यांचा रुग्णांनुबंध त्यांनी केलेल्या कार्याच्या माध्यमातून जुळू लागला आहे.



अकलूज नंतर आशिया खंडातील सगळ्यात मोठी ग्रामपंचायत म्हणून नावलौकिक मिळवलेल्या मजरेवाडी ग्रामपंचायतच्या हद्दीत आज साडेपाचशे ते सहाशे नगरे वसली आहेत. या भागांत विमानतळ, रेल्वे स्टेशन आणि विविध इंडस्ट्रियल एरिया वाढलेला आहे. अशा या मजरेवाडी भागात नगरे वसवण्याचे काम हत्तुरे परिवाराने केले. याच परिवारातील एक विश्वसनीय आणि आश्वासक आणि युवा चेहरा सोलापूरच्या राजकारणात गेल्या काही वर्षांपासून कार्यरत आहे.

सोलापूरमध्ये हक्काच्या ताई म्हणून प्रसिद्ध असलेल्या आ. प्रणिती शिंदे यांनी जाई जुई विचारमंचच्या माध्यमातून सामाजिक कार्य करून राजकारणात प्रवेश केला. त्याच जाईजुई विचारमंचच्या माध्यमातून कार्यरत राहून आपल्या सामाजिक कार्याचा श्रीगणेशा हत्तुरे यांनी केला. तेव्हापासून विविध क्षेत्रात चौफेर वाटचाल केली. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि विष्णुपंत (तात्या) कोठे नेतृत्त्वाच्या माध्यमातून सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन सभापतीपदी काम करण्याची संधी मिळाली. त्या संधीचे सोने करून त्यांनी परिवहनला गती देण्याचे काम केले होते. त्यानंतरही राजकारणी म्हणून न वावरता एक समाजकारणी म्हणून वावरण्यावर त्यांनी भर दिला आहे.

मुलतानी बेकरी ते साखर कारखाना या रस्त्यावर पथदिव्यांअभावी अंधाराचे साम्राज्य होते. अंधारलेल्या दिशेत प्रवास करणे जिकीरीचे होते. ते पाहून रस्त्यावरच्या स्ट्रिट लाईटला निधी मिळून अंधारल्या वाटांना प्रकाशमान करण्याचे काम विजयकुमार हत्तुरे यांच्या माध्यमातून झाले आहे. मुलतानी बेकरी ते श्री सिद्धेश्वर साखर कारखाना ४० लाखांच्या पथ दिव्याचे झालेले काम हे विशेष उल्लेखनीय आहे. कारण आमदार- खासदार किंवा कोणत्याही बड्या नेत्याचा वारसा नाही. तरी देखील केवळ जनतेच्या प्रश्नाची जाण असल्याने पोटतिडकीने केलेल्या पाठपुराव्यातून हत्तुरे यांना हे यश मिळाले आहे. कोरोना महामारीच्या काळात कोरोना योद्धा म्हणून उल्लेखनीय कामगिरी त्यांनी केले आहे. याच काळात ग्रामीण भागातील सुमारे पाचशे ते सहाशे शेतकऱ्यांचे भाजीपाला विक्रीसाठी जागेची अडचण होती ते सुद्धा हत्तुरे वस्ती भाजीपाला मार्केटसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लावला. या भागातील सर्वसामान्य नागरिकांना, महिलांना, शेतकऱ्यांसाठी खूप मोठी सोय झाली आहे. विविध शासकीय योजना, आरोग्य, रक्तदान शिबिर यशस्वी आयोजन केले आहेत. धार्मिक व सांस्कृतिक, क्रीडा उपक्रम दरवर्षी घेतात.

### लिंगायत स्वतंत्र धर्म आंदोलनात पुढाकार



विजयकुमार हत्तुरे यांनी राजकारण करत असतानाच आपल्या लिंगायत समाजामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली. लिंगायत स्वतंत्र धर्मासाठी संपूर्ण राज्यभर झालेल्या आंदोलनात सहभाग दर्शवला. अखिल भारतीय लिंगायत समन्वय समितीच्या माध्यमातून संपूर्ण राज्य ढवळून काढले. सोलापुरात झालेल्या भव्य लिंगायत मोर्चामध्ये त्यांनी पुढाकार घेत मोर्चा यशस्वी केला. त्यामुळेच ते लिंगायत समाजामधील एक आश्वासक, कृतिशील आणि युवा चेहरा म्हणून पुढे आले आहेत. दक्षिण तालुक्यातील लिंगायत समाज एकत्र करण्यातही त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे.

### चिमणी प्रकरणात काडादी यांना खंबीर साथ



हजारो शेतकरी सभासदांचा उदरनिर्वाह असलेल्या साखर कारखान्याच्या चिमणी प्रकरणात विजयकुमार हत्तुरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सुरुवातीपासून ते धर्मराज काडादी यांच्या बाजूने उभे राहिले. चिमणी पडल्यानंतर सभासदांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे नुकसान होणार आहे वारंवार त्यांनी समाज माध्यमांसमोर पटवून दिले तसेच महापालिका आयुक्तांना वेळोवेळी निवेदन दिले. ही बाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कानावर घातली आणि त्यांना तातडीने सोलापूरला येऊन काडादी यांना भेट देण्याचे सुतोवाच केले. विजयकुमार हत्तुरे यांच्या एका फोनवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले सोलापुरात आले आणि चिमणी पाडकाम प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली तसेच काँग्रेसचे सरकार आल्यानंतर चिमणी पुन्हा बांधून देण्याचे आश्वासन दिले.

### धार्मिक पर्यटन वाढीसाठी प्रयत्नशील

● परमपूज्य चन्नवीर शिवाचार्य होटगी गाव, इंगळगीमार्गे काशी विश्वेश्वर जेऊर, श्री स्वामी समर्थांचे अक्कलकोट स्टेशन, जागृत हनुमान गौडगाव, तुप्पीन मठ नागणसूर, खाजासाहेब मुलक हैद्रा व महाराष्ट्र-कर्नाटकातील तीर्थक्षेत्र मणूर यल्लमा सोलापूर ते हैद्रा तसेच मणुर गाव हा मार्ग तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करून रस्त्याला नॅशनल हायवे दर्जा द्यावा, ही प्रमुख मागणी असणार आहे. याच मार्गावर एनटीपीसी, अनेक सिमेंट फॅक्टरी आहेत. दक्षिण भारतातील प्रमुख होटगी जंक्शन स्टेशन आहे. सोलापूर विमानतळ आहे, विजापूर रोड व हैदराबाद रोड चेन्नई एक्सप्रेसला जोडणारा रिंगरोड आहे. त्यामुळे या मार्गाला नॅशनल हायवेचा दर्जा द्यावा. या मागणीसाठी केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी करणार असल्याचे हत्तुरे यांनी सांगितले.

● दक्षिण तालुक्यात धार्मिक पर्यटन वाढीस लागणार आहे. रस्त्यामुळे दळणवळणाची सुविधा निर्माण होणार आहे उद्योगधंदे येण्यास मदत होणार आहे येथील शेतकऱ्यांचा आणि स्थानिक नागरिकांना याचा मोठा लाभ होणार आहे रोजगाराच्या सुविधा निर्माण होणार आहेत.

होटगी रोड हा व्हीआयपी रस्ता ओळखला जातो. परंतु आसरा चौक ते साखर कारखाना रस्त्यावर प्रचंड रहदारी आहे. याकरिता रस्ता मोठा करून सर्वसामान्य नागरिकांना येण्या जाण्याकरिता फुटपाथ बांधून घेण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार असल्याचे हत्तुरे म्हणतात.



● स्वर्गीय माजी खासदार आप्पासाहेब काडादी, सहकार महर्षी कै.वि.गु.शिवदारे, लोकनेते बाबुराव चाकोते, कै.ब्रह्मदेवदादा माने, कै.आनंदराव देवकते, कै.भीमराव पाटील वडकबाळकर, कै.उमाकांत राठोड, कै.गुरुनाथ पाटील, कै.गोपाळ (काका) कोरे, कै. विष्णुपंत (तात्या) कोठे तसेच माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब यांच्या विचारांचा वारसा घेऊन लोकहितासाठी झटणारा, जनतेच्या समस्यासाठी लढणारा जनसेवक, कृतिशील, मितभाषी, प्रेमळ, उद्यमशील सर्वसामान्यांचा नेतृत्व करणारा जनता गॅरेजमधून निर्माण झालेला जनतेचा आमदार विजयकुमार हत्तुरे ही बिरदावली त्यांना योग्य व सार्थ ठरते.

# सुराज्य २१ वा वर्धापन दिन विशेष













